बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ०८ | बुधवार,दि.१ फेब्रुवारी २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

## तीन नराधमांचा अल्पवयीन मुलीवर सामुहिक अत्याचार



**गोंदिया:–** शहरातील एका १६ वर्षाच्या मुलीवर गोंदिया तसेच नागपूर येथे सतत तीन दिवस सामुहिक बलात्कार करणाऱ्या तीन नराधमांवर गोंदिया शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. तर एक आरोपी फरार आहे. प्रशांत मुलचंद मोटघरे (२७) रा. सिंगलटोली आंबेडकर वॉर्ड गोंदिया व ढाकणी येथील सौरभ ईश्वर मेश्राम (२३) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. ही कारवाई २८ जानेवारी रोजी करण्यात आली.

शहरातील एका अल्पवयीन मुलीला येथील मामा चौकातून २४ जानेवारी रोजी उचलून तिला बांधतलाव येथे नेऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आला. दोन तासानंतर पुन्हा तिला मामा चौकात सोडण्यात आले.

यानंतर दुसऱ्याने लगेच तिला एमआयडीसी मुंडीपार परिसरात नेऊन अत्याचार केला. रात्री ९ वाजताच्या सुमारास तिला मामा चौकात सोडल्यावर तिला नागपूर येथील एका व्यक्तीच्या स्वाधीन करण्यात आले. त्याने नागपूर येथे नेऊन तिच्यावर २४ ते २७ जानेवारी या काळात अत्याचर केला. २७ जानेवारी रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास तिला गोंदियात सोडले.यानंतर पीडित व कुटुंबीयांनी पोलिसात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी तिन्ही नराधमांवर भादंविच्या कलम ३६३, ३७६, ३७६ (२), (एन), ३५४ अन्वये गुन्हा दाखल करून आरोपी प्रशांत मोटघरे व सौरभ मेश्राम यांना अटक केली असून एक आरोपी फरार आहे. दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना १० फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

## शिक्षक मतदार संघ निवडणुकीत जिल्ह्यात ८७.५८ टक्के मतदान

**गोंदिया:–**विधानपरिषदेच्या नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत नागपूर विभागातील ६ जिल्ह्यांमध्ये जवळपास सरासरी ८६.२३ टक्के मतदान झाले आहे. तसेच नाशिक विभागात ४९.२८ टक्के, अमरावती विभागात ४९.६७ टक्के, औरंगाबाद विभागात ८६ टक्के, आणि कोकण विभागात ९१.०२ टक्के मतदान झाले आहे, अशी माहिती आयोगाकडून देण्यात आली आहे.विधान परिषदेच्या नागपूर शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी ३० जानेवारी रोजी नागपूर ८१.४३ टक्के, वर्धा ८६.८२ टक्के, चंद्रपूर ९१.८९ टक्के, भंडारा ८९.१५ टक्के, गोंदिया ८७.५८ टक्के, गडचिरोली ९१.५३ टक्के मतदारांनी मतदान केले.



या निवडणुकीत एकूण २२ उमेदवार रिंगणात असून जिल्ह्यातील ३८८१ शिक्षक मतदार संख्या होती. सकाळी ८ वाजतापासून मतदानाला सुरुवात झाली. शिक्षक मतदारांनीही सकाळीपासूनच मतदानालासाठी केंद्रावर गर्दी केली. जिल्ह्यात तिरोडा तहसील कार्यालय, जिप विद्यालय दवनीवाडा, प्रशासकीय इमारत गोंदिया, आमगाव तहसील कार्यालय, गोरेगाव तहसील कार्यालय, सालेकसा तहसील कार्यालय, देवरी तहसील कार्यालय, जिप विद्यालय नवेगावबांध, सडक अर्जुनी तहसील कार्यालय व अर्जुनी मोर तहसील कार्यालय अशा १० मतदान केंद्रावर सायंकाळी ४ वाजतापर्यंत शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली.

यात गोंदियातील मतदान केंद्रावर ११९९ मतदारांपैकी ९६१ मतदारांनी मतदान केले असून त्याची टक्केवारी ८०.१५, दवनीवाडा केंद्रावर २४५ पैकी १८८ मतदारांनी मतदान केले असून त्याची टक्केवारी ७६.७३, तिरोडा केंद्रावर ४८९ पैकी ४३५ मतदारांनी मतदान केले असून टक्केवारी ८८.९६, आमगाव केंद्रावर ३७३ पैकी ३४८ मतदारांनी केले असून टक्केवारी ९३.३०, सालेकसा केंद्रावर १४२ पैकी १३२ मतदारांनी मतदान केले असून टक्केवारी ९२.९६, गोरेगाव केंद्रावर २८५ पैकी २६९ मतदारांनी मतदान केले असून टक्केवारी ९४.३९, सडक अर्जुनी केंद्रावर २४६ पैकी २२४ मतदारांनी मतदान केले असून टक्केवारी ९१.०६, देवरी केंद्रावर ३६६ पैकी ३४५ मतदारांनी मतदान केले असून टक्केवारी ९४.२६, नवेगावबांध केंद्रावर २११ पैकी १९४ मतदारांनी मतदान केले असून टक्केवारी ९१.९४ व अर्जुनी मोर केंद्रावर ३२५ पैकी ३०३ मतदारांनी मतदान केले असून त्याची टक्केवारी ९३.२३ आहे. जिल्ह्यातील एकूण ३८८१ मतदारांपैकी ३३९९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून त्याची टक्केवारी ८७.५८ आहे. आता २ फेब्रुवारी रोजी मतमोजणीनंतर जाहीर होणाऱ्या निकालाकडे रिंगणातील २२ उमेदवारांसह शिक्षक मतदारांचे लक्ष लागले आहे.



## दोन नक्षलवाद्यांना अटक; "टीसीओसी' च्या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलिसांची कारवाई

**गडचिरोली :** नक्षलवाद्यांच्या "टीसीओसी"च्या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलिसांना दोन नक्षल्यांना अटक करण्यात यश आले आहे. मंगेश ऊर्फ कांडेराम पोटावी (३३ रा. होरादी, छत्तीसगड), चिन्ना मासे झोरे (४०, रा. रामनटोला) असे अटक करण्यात आलेल्या नक्षलवाद्यांची नावे आहेत. फेब्रुवारी ते मे या काळात नक्षलवादी "टीसीओसी"(टक्टिकल काऊंटर ऑफेन्सिव्ह कॅम्पेन) साजरा करतात. यादरम्यान ते मोठ्या प्रमाणात हिंसक कारवाया घडवून आणतात. या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलिसांनी राबवलेल्या मोहिमेत दोन नक्षल्यांना अटक करण्यात यश आले.

त्यापैकी मंगेश हा जहाल नक्षली असून त्याला गोपनीय माहितीच्या आधारे एटापल्ली तालुक्यातील कसनसूर येथून ताब्यात घेण्यात आले. तो छत्तीसगड राज्यातील नारायणपूर येथे परालकोट दलम कमांडर (चेतना नाट्य कलामंच) पदावर कार्यरत होता.२००५ मध्ये नक्षल चळवळीत सहभागी झाल्यानंतर त्याने गारपा व बोरेवाडा चकमकीत सक्रिय भूमिका निभावली होती. त्याच्यावर दरोडा, खून, जाळपोळ आदी प्रकरणात गुन्हे दाखल आहेत, तर दुसरा नक्षली चिन्ना हा जनमिलिशिया सदस्य म्हणून सक्रिय होता. त्याला जांबिया जंगल परिसरातून ताब्यात घेण्यात आले.

गर्देवाडा भूसुरुंगस्फोट व चकमक, बांधकामावरील वाहनांची जाळपोळ करणे आदी प्रकरणात त्याला अटक करण्यात आली आहे. गडचिरोली पोलिसांनी राबवलेल्या नक्षलविरोधी अभियानात वर्षभरात ६३ नक्षल्यांना अटक करण्यात यश आले आहे. पोलीस अधीक्षक निलोत्पल यांच्या मार्गदर्शनात पोलिसांनी ही कारवाई केली असून नक्षलविरोधी अभियान प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.

## स्व.मनोहरभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त सुवर्णपदक वितरण समारोह ९ फेब्रुवारीला

**गोंदिया :–** गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील स्वनामधन्य नेता व शिक्षण महर्षी स्वगीय मनोहरभाई पटेल यांच्या ११७ व्या जयंतीनिमित्त ९ फेब्रुवारी २०२३ रोज गुरुवारला सुवर्णपदक वितरण समारंभाचा कार्यक्रम एन. एम. डी. महाविद्यालयाच्या



प्रांगणात सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. या सुवर्णपदक वितरण समारंभ प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. सुवर्णपदक वितरण कार्यक्रमाचे आयोजन गोंदिया शिक्षण संस्था, मनोहरभाई पटेल स्मृती समिती व गुजराती राष्ट्रीय केळवणी मंडळ द्वारा करण्यात येत आहे. या स्वर्णपदक वितरण सोहळ्याला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन माजी आमदार व गोंदिया शिक्षण संस्थेचे सचिव श्री राजेंद्र जैन यांनी केले आहे.

## ११ लाखांचा गांजा जप्त,तीन तस्करांना अटक

**गोंदिया :** शहरातील गड्डाटोली परिसरातील एका घरातून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ७५ किलो गांजा जप्त केला आहे. याची किंमत ११ लाख ३२ हजार २४५ रुपये आहे. ही कारवाई ३० जानेवारी रोजी सायंकाळी करण्यात आली असून या प्रकरणी तीन गांजा तस्करांना अटक करण्यता आली आहे.

शहरातील अनेक भागात गांजा खुलेआम विक्री करण्यात येत आहे. या गांजाच्या आहारी अल्पवयीन मुले जात आहेत.उडीसा व आंध्र प्रदेश येथून गोंदिया जिल्ह्यात गांजाची तस्करी करण्यात येत असल्याचे बोलले जात आहे. शहरातील गड्डाटोली परिसरातील झोपडी मोहल्ल्यातील एका घरात गांजा साठवून ठेवल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्यांनी ३० जानेवारी रोजी सायंकाळी धाड टाकली. यावेळी ७५ किलो गांजा त्यांना आढळून आला.

पोलिसांनी ७५ किलो ४८३ ग्राम गांजा किंमत ११ लाख ३२ हजार २४५ व इलेक्ट्रॉनिक वजन काटा किंमत ३ हजार रुपये असा एकूण ११ लाख ३५ हजार २४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी आरोपी शुभम (वय २०, रा. पुनाटोली), मनिष (वय २५, रा. गांधी वॉर्ड) व आकाश उर्फ टेंपो उर्फ छोटू (रा. कन्हारटोली) यांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात आरोपींविरूद्ध भादंवि कलम ८ (क) २०, २९ एनडीपीएस ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## यात्रे दरम्यान गर्दीचे व्यवस्थापन सुनिश्चित करा-कर्नल विश्वास सुपनेकर

**गोंदिया :** कचारगड यात्रेला विविध राज्यातून भाविक येत असतात. त्यामुळे गर्दीचे व्यवस्थापन सुनिश्चित करण्यात यावे अशा सूचना सेवानिवृत्त कर्नल विश्वास सुपनेकर यांनी दिल्या. कचारगड–धनेगाव येथील सभागृहात आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. अर्जुनी/मोर उपविभागीय अधिकारी विजयकुमार सुर्यवंशी, जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले, जिल्हा पुरवठा अधिकारी लिना फलके यावेळी मंचावर उपस्थित होते.

यात्रे दरम्यान अचानकपणे कुठलीही आपत्ती येऊ शकते. त्यामुळे अग्नीशमन दल, आरोग्य विभाग, औषध व अन्न पुरवठा, विद्युत विभाग, पाणी पुरवठा विभाग व पोलीस विभागानी सतर्क राहून काम करावे अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. चार भागात विभागनी करुन प्रत्येकाचे नोडल अधिकारी नेमून गर्दीचे व्यवस्थापन केले तर यात्रा सुलभरित्या पार पाडण्यास मदत होते. यात्रे दरम्यान सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याची गरज आहे. इवेंट काय आहे याची माहिती असणे गरजेचे आहे. मुक्काम करणाऱ्या भाविकांची योग्य ती व्यवस्था करण्यात यावी असे त्यांनी सांगितले.

भाविकांना योग्य त्या सोई–सुविधा पुरविण्यात याव्यात. लाईटची व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक असून त्याला बॅकअप (जनरेटर) असणे गरजेचे आहे. पोलीस विभागाने रिकवरी टीम ठेवण्यात यावी व त्याबाबत नियोजन करण्यात यावे. दुकानदारांची नाव नोंदणी करणे गरजेचे आहे. यात्रे दरम्यान नागरिकांना भोजनदान दिले जाते, त्यामुळे अन्नाचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पुरेपूर औषधी साठा उपलब्ध करुन ठेवावा. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालय व्यवस्था तसेच अग्नीशमन दलाची व्यवस्था करण्यात यावी. यात्रे दरम्यान Unity of Command चा वापर करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले.



ज्या ठिकाणी धोकादायक रस्ता आहे त्या ठिणाणी बॅरिकेटींगची व्यवस्था करण्यात यावी. पार्कींगची व्यवस्था सुनियोजित करणे गरजेचे आहे. ट्राफीकला डायरेक्शन असणे आवश्यक आहे. अचानकपणे एखादी दुर्घटना घडली तर Resources ठेवण्यात यावे. येण्या–जाण्याची ट्राफीक कंट्रोल करणे आवश्यक आहे. सगळ्या दुकानदारांना demonstration देणे गरजेचे आहे. यात्रा सुलभरित्या पार पाडण्यासाठी योग्य नियोजन करण्यात यावे. Crowd managmet व Crowd control याबाबत विचार करण्यात यावा. यात्रे दरम्यान कुठल्याही आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी सज्ज रहावे. पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवावा. ज्या विभागाला जबाबदारी दिलेली आहे त्यांनी आपली जबाबदारी अचुकपणे पार पाडावी. प्रत्येक विभागाने आपसात समन्वय ठेवणे गरजेचे आहे, असे कर्नल सुपनेकर यांनी यावेळी सांगितले.

सालेकसा तालुका मुख्यालयापासून ६ कि.मी. अंतरावर हाजरा फॉल निसर्गरम्य पर्यटन स्थळ असून जवळच आदिवासी कुलदैवतेचे श्रध्दास्थान म्हणून कचारगड देवस्थान आहे. या ठिकाणी दरवषी फेब्रुवारी माघ पौणिमेनिमीत्त पाच दिवसाच्या यात्रेचे आयोजन व आदिवासी महासंमेलना निमीत्त सदर यात्रेस मोठ्या प्रमाणात झारखंड, बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र व इतर राज्यातून भाविक येत असतात. यावर्षी ३ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी पर्यंत कचारगड यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. असे यावेळी सांगण्यात आले.

कार्यशाळेस तहसिलदार (अर्जुनी/मोर) विनोद मेश्राम, अपर तहसिलदार (गोंदिया) अनिल खडतकर, तहसिलदार (सालेकसा) डी.एम.मेश्राम, ठाणेदार जनार्दन हेगडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विजय बिसेन यांचेसह जिल्ह्यातील विविध विभागाचे प्रमुख अधिकारी तसेच कचारगड देवस्थान समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेचे सुत्रसंचालन करुन उपस्थितांचे आभार आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी मानले.

## जिल्हा परिषदेच्या सांस्कृतिक व क्रिडा संमेलनात कंत्राटींना होकार,शिक्षकांना नकार



**गोंदिया:** गोंदिया जिल्हा परिषदेच्यावतीने अनेक वर्षाच्या कालावधीनंतर जिल्हापरिषद,पंचायत समिती अंतर्गत कार्यरत कर्मचारी वर्गासाठी क्रिडा व सांस्कृतीक सम्मेलनाचे आयोजन यावर्षी ९ व १० फेब्रुवारीला करण्यात आले आहे. या समेलनाचे उदघाटन ९ फेब्रुवारीला सकाळी ८ वाजता जिल्हा क्रिडा संकुल येथे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्या हस्ते होणार आहे.

मात्र जिल्हा परिषदेच्या या सांस्कृतिक व क्रिडा समेंलनात जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातंर्गत कार्यरत असलेल्या शिक्षकांना डावलण्यात आले आहे.एकीकडे जि.प.कर्मचारी अधिकारी यांच्याकरीता हे सम्मेलंन असताना शिक्षक जिल्हा परिषदेचे कर्मचारी नाहीत का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.जेव्हा की कंत्राटी तत्वावर लागलेल्या कर्मचाऱ्यांना सम्मेलनात सहभागी होता येणार आहे.विशेष म्हणजे या समेलनातील विविध कार्यक्रमासाठी खेळासह इतर स्पर्धेत भाग घेत असलेल्यांची नावे नोंदविण्यासाठी मात्र शिक्षण विभागाने १०–१२ शिक्षकांची निवड केली आहे.एकीकडे नाव नोंदणीकरीता शिक्षकांची सेवा ग्राह्य धरली जात असताना समेंलनातूनच त्यांना डावलण्यामागचा हेतू काय यावर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष बोलणार की बघ्याची भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

कायक्रमाला जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणवीर,अर्थ व बांधकाम सभापती संजयसिंह टेंभरे, कृषी व पशुसंवर्धन सभापती रुपेश कुथे,महिला बालकल्याण सभापती श्रीमती सविता पुराम व समाजकल्याण सभापती श्रीमती पुजा सेठ या उपस्थित राहणार आहेत. सकाळी ८ वाजेपासून विविध क्रिडा खेळांना सुरवात होणार असून आरोग्य तपासणीही केली जाणार आहे. त्यानंतर सायकांळी ४ वाजता जिल्हा परिषद सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.१० फेब्रुवारीला सकाळी ८ वाजता क्रिडा स्पर्धेतील अंतिम स्पर्धा खेळविल्या जाणार आहेत. तर सायकांळी ४ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धेचा समारोप ठेवण्यात आलेला आहे. समारोपानंतर कर्मचारी अधिकारी वर्गाकरीता अल्पोहाराची सोय सायकांळी ६ वाजता करण्यात आली आहे.या स्पर्धेमध्ये पं. समिती व जिल्हा परिषदस्तरावर कार्यरत अधिकारी व कर्मचारी हे सहभाग नोंदवू शकतात असे आवाहन जि.प. उपमुख्य कार्यकारी अधिकारी नरेश भांडारकर यांनी केले आहे.

## फुले शाहू आंबेडकर विचारमांचावरुन कर्मयोगी गाडगेबाबा साहित्य नागरीत पेटणार विद्रोहाची मशाल

### १७ व्या अ. भा. विद्रोही मराठी साहित्य संमेलांची वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम पत्रिका

### रसिका आगाशे आयुब उद्घाटक तर डॉ.यशवंत मनोहर न्या.बी.जी.कोळसे पाटील प्रमुख पाहुणे

**वर्धा:–** एकीकडे राजाश्रयातून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत असताना दुसरीकडे लोकाश्रयातून त्याच तारखांना होणाऱ्या सतराव्या अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलनामुळे साहित्य रसिकांना विद्रोहीच्या कार्यक्रमपत्रिकेबद्दल मोठी उत्सुकता लागली होती. ती उत्सुकता आता संपली असून विद्रोही संमेलनाची कार्यक्रम पत्रिका अधिकृतपणे विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे राज्य संघटक किशोर ढमाले, स्वागताध्यक्ष प्रा. नितेश कराळे व मुख्य संयोजक डॉ. अशोक चोपडे यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केली. महाराष्ट्रातून नंदुरबार, धुळे, पुणे, मुंबई, लातूर, सिंधुदुर्ग, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, अहमदनगर आदी जिल्ह्यातून विचारवंत, अभ्यासक, रसिक मोठ्या संख्येने उपस्थित राहार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

संमेलनाचे उद्घाटन ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता प्रसिद्ध लेखिका सिने अभिनेत्री व नाट्य दिग्दर्शिका रसिका आगाशे–अय्युब, मुंबई यांच्या हस्ते होणार आहे तर या संमेलनाचे अध्यक्षस्थान जेष्ठ पत्रकार "गांधी का मरत नाही' या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक व विविध सामाजिक चळवळीत अग्रणी काम केलेले चंद्रकांत वानखडे भुषवणार आहेत. यावेळी मावळते संमेलनाध्यक्ष गणेश विसपुते, पुणे, प्रसिद्ध आंबेडकरवादी विचारवंत डॉ. यशवंत मनोहर नागपूर, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. अजिज नदाफ, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. प्रतिभा अहिरे, प्रा. रामप्रसाद तौर तसेच झरना झव्हेरी, मुंबई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. यावेळी विद्रोही जीवन गौरव पुरस्कारांचे वितरण, बोधचिन्हकार व गीतकार यांचा सत्कार होणार आहे. मुख्य उद्घाटन सोहळ्यापुर्वी शहरातील सर्व महामानवांच्या पुतळ्यांना हारार्पण करुन सकाळी ८.३० पासून छ. शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला हारार्पण करून विद्रोही साहित्य संस्कृती विचार यात्रेची झाँकी शहराच्या प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करीत




संमेलनस्थळी पोहोचणार आहे. मुख्य सभामंडपाला ग्रामगीतकार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे नाव देण्यात आले आहे तर मुख्य विचारपीठाला फुले शाहू आंबेडकर विचार मंच असे नाव देण्यात आले आहे. विद्रोही साहित्य संमेलन ज्या सर्कस ग्राऊंड वर होणार आहे त्या संपुर्ण परिसराला "कर्मयोगी सत्यशोधक संत गाडगेबाबा साहित्य नगरी" असे नाव देण्यात आले आहे.

या संमेलनाचा समारोप प्रसिद्ध न्यायमूर्ती बि. जी. कोळसे पाटील यांचे हस्ते होणार आहे. यावेळी समारोपीय समारंभात प्रमुख पाहुणे प्रसिद्ध सनदी अधिकारी इ. झेड. खोब्रागडे, सुप्रसिद्ध पत्रकार रणजीत मेश्राम, अँड. गणेश हलकारे, निरंजन टकले प्रसिद्ध लेखक, गंगाधर बनबरे इत्यादिंची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या संमेलनाचे समारोपीय सत्रामध्ये आंतरजातीय धर्मिय विवाहितांचा विशेष सन्मान केला जाणार आहे.

या संमेलनात १) मराठी साहित्य संस्कृतीला अब्राह्मणी धर्म प्रवाहांनीच समृद्ध केले, २) लेखकाची सांस्कृतिक भुमिका काय आहे? काय असावी?; ३) महामानवांची बदनामी, माफीविरांचे उदात्तीकरण, इतिहासाचे विकृतीकरण आणि संस्कृतीच्या मिरासदारांचे राजकारण; ४) सत्यशोधक समाज, स्वातंत्र्य चळवळ ते दलित पँथर, महाराष्ट्राचा प्रवास आणि मराठी साहित्याच्या सामाजिक बांधीलकीचा अनुशेष या विषयावर चार परिसंवादातून समकालीन साहित्य, संस्कृती सोबतचा लढवू ऐतिहासिक वारसा जपण्याचा व पुढे नेण्यासाठी परिसंवादाचे आयोजन वैशिष्ट्यपूर्णरीत्या करण्यात आले आहे.

वऱ्हाडी शब्दकोषकार कवी देविदास सोटे स्मृतीस समर्पित कवी व गझलकार संमेलन, गझलकार रामदास कुहिटे यांच्या स्मृतीस समर्पित कवी व गझलकार संमेलन आयोजित करण्यात आले आहे. त्यामध्ये ज्ञानेश वाकुडकर,




अनंता राऊत, डॉ. भुषण रामटेके, खेमराज भोयर, यशवंत मकरंद अशा प्रसिद्ध कवींचा सहभाग राहिल. या संमेलनात "गाणी परिवर्तनाची, महाराष्ट्र दर्शन, द नेशन हा द्विपात्री नाट्य प्रयोग, ज्योती झाली ज्वाला हा एकपात्री प्रयोग, मी भिडेवाडा बोलतो हा एकपात्री प्रयोग, मी सावित्री ज्योतीराव फुले हा एकपात्री प्रयोग, सावित्रीच्या लेकिंच्या व्यथा हा प्रयोग,' चित्रकाव्य व पोस्टर प्रदर्शन यांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच व्यंगचित्र प्रदर्शन आणि महात्मा फुले शिष्या मुक्ता साळवे बालमंच हे विशेष आकर्षण राहणार आहे.

समकालीन सामायिक महत्वाच्या मुद्दयांवर उदा. नवे शैक्षणिक धोरण, माध्यमांची गळचेपी, जातिनिहाय जनगणना, कोरोना नंतरचे वास्तव व स्त्रियांसमोरील आव्हाने, विदर्भातील शेती प्रश्न, एल.जी.बी.टी.क्यु. समुदाय व त्यांचे प्रश्न, भटके विमुक्त यांच्या चळवळी, संविधान संस्कृती, पर्यावरणाचा ऱ्हास, विकासाचा अनुशेष, महात्मा गांधी, विनोबा भावे आदि विषयांवर गटचर्चांचे आयोजन संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी करण्यात आले आहे. १२ पानी झरीळझर विद्रोही ने आज जाहीर केली . १० नाट्य प्रयोग, एकपात्री, दविपात्री, प्रयोग असून ४ चळवळ गीते, संस्कृती दर्शन कार्यक्रम, ४ परिसंवाद १६ गटचर्चा यांचा समावेश विद्रोहीत आहे. संमेलनाच्या पूर्व संध्येला वऱ्हाडी बोलीतील जनवादी नाटक व्हाया सावरगाव खुर्द, सोबतच सीएए–एनआरसी प्रश्नावरील नाटकांचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलन प्रांगणात सादर होणाऱ्या नाटकाचा लाभ सर्व रसिकांनी घ्यावा असे आवाहन राज्य संघटक किशोर ढमाले, मुख्य संयोजक डॉ. अशोक चोपडे व नितेश कारळे यांनी केले आहे.

## संपादकीय

# विहंगम खेळातून सानियाची निवृत्ती

ऑस्ट्रेलियन ओपन टुर्नामेंटमध्ये मिक्स्ड डब्ल्सच्या अंतिम फेरीतील पराभवानंतर भारताची स्टार टेनिसपटू सानिया मिर्झाने शुक्रवारी ग्रँड स्लॅम स्पर्धेचा निरोप घेतला. आता पुढच्या महिन्यात दुबईमध्ये ती आपल्या कारकिर्दीतील शेवटचा टेनिस सामना खेळणार आहे. जवळपास दोन दशके भारतीय उपखंडातील टेनिस चाहत्यांच्या हृदयसिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या सानियाच्या अलविदाने यापुढे काही दिवस तरी चाहत्यांना चुकचुकल्यासारखे होईल. त्यामागील कारण म्हणजे ज्या पद्धतीने सानियाने आपली कारकीर्द बहरत नेली, ज्या लेव्हलला ती खेळत आहे तिथे अन्य भारतीय महिला खेळाडू कोणी नाहीत. शिवाय तिच्या खेळातील नजाकत, यश यांनी सजलेली भरगच्च कारकीर्द डोळ्यांचे पारणे फेडणारी आहे.जागतिक पटलावर सध्या ती ज्या स्थानावर आहे, तिथपर्यंत पोहोचणे भारतच काय पण शेजारील पाकिस्तान, लंका, बांगलादेश, नेपाळ या देशांतील खेळाडूंनाही जमले नाही. यापुढेही तरी जमेल याची शक्यता फारच कमी आहे. ती भारतीय खेळाडू जरी असली, तरी या पाच-सहा देशांचे जणू काही अप्रत्यक्ष प्रतिनिधित्वच करत आहे. त्यामुळे एकमेव अशी महिला टेनिसपटू सानियाला यापुढे खेळताना न पाहणे हे चाहत्यांकरिता सुरुवातीचे काही दिवस तरी अवघडल्यासारखे होईल. आशिया म्हणजे क्रिकेटवेडा खंड म्हणून ओळखला जातो. त्यात भारत म्हणजे क्रिकेटचे माहेरघर. क्रिकेट ही येथील लोकांची चौथी गरज. त्याला अन्य खेळ पर्याय असूच शकत नाही. असला तरी तो जेवणातल्या लोणच्यासारखा. अशा कठोर क्रिकेटवेड्या देशात जन्मलेल्या सानियासारख्या मुलीला टेनिसपटू म्हणून मोठे होणे हे स्वप्नापेक्षा कमी नव्हते. तशी "चूल आणि मूल' ही येथील महिलांबाबत असलेली संकल्पना केव्हाच मागे सरली होती.

पण क्रिकेटचे भूत मात्र येथील लोकांच्या मानगुटीवरून उतरले नव्हते आणि उतरणारही नाही. अशा आव्हानांचा सामना करत सानियाचे बालपण गेले. वडील क्रिडा पत्रकार आणि घरात क्रिडा पार्श्वभूमी होती. तशी घरची परिस्थिती ठिकठाकच होती. त्यामुळे तिचे टेनिसकडे वळणे हे स्वाभाविकच होते. घरातील या पूर्वासुरीच्या मर्यादित छायेत न रमता तिने लाँग जंप घेतली. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षापासून ती टेनिस कोर्टवर तरतरायला लागली. तिच्या खेळातील नजाकती, वावर, सावध-पणा, हालचाली, प्रतिकार, हल्ला अशा सर्वच आघाड्यांवर तिने स्वत:ला सिद्ध केले. प्रशिक्षकांनाही तिच्या खेळाची भुरळ पडली आणि फारच कमी कालावधीत तिने आंतरराष्ट्रीय लेव्हलला भारतीय खेळाडू म्हणून दरवाजा ठकठकवला. एकदाचा तो खोलला आणि मग तिने मागे वळून पाहिलेच नाही. आपल्या कारकिर्दीत तिने सहा ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकल्या आहेत. लिअँडर पेस, महेश भूपती, बोपन्ना या पंक्तीत सानियाचे नाव अभिमानाने घेतले जाऊ लागले. पद्मभूषण (२००४), अर्जुन पुरस्कार (२००४), पद्मश्री (२००६) आणि राजीव गांधी खेलरत्न (२०१५) पुरस्कार तिने पटकावले. ती आतापर्यंतची सर्वात यशस्वी भारतीय महिला टेनिसपटू आहे. खेळाबरोबरच ती आपल्या सौंदर्यानेही अनेकदा चर्चेत राहिली. त्या सौंदर्याभोवती तिचा खेळ थबकला नाही.

त्याउपर तिच्या खेळातले सौंदर्य अधिक भावून गेले. ते कमालीचे विहंगम होते. तिचा "फोर हँड' म्हणजे बेमिसाल मानला जातो. ती इतक्या स्ट्राँगली तो टोलवते की प्रतिस्पर्ध्याला दिवसाचेही तारे दिसतात. तो रोखताना समोरील खेळाडूची पंचाईत होते. पुरुष खेळाडूचीही तो रोखताना तारांबळ उडते. तिच्यातला धाडसीपणा मन जिंकून जा-तो. त्याचे प्रतिबिंब खेळात उमटते. त्याच्यातूनच तिच्यातल्या खेळातली डेअरिंग नरजेत सहज भरते. त्वेश, आवेग अशी आक्रमक विशेषणे तिला अभिमानाने चिकटतात. तिचा खेळ जिंकण्या किंवा हरण्यापर्यंत मर्यादित नाहीच. त्याउलट तिचा भर चेंडू जोरात मारण्यावर असतो. तिच्यातला हा बिनधास्तपणा, वकुबीपणा विजयाला तिच्यासमोर गुडघे टेकायला प्रवृत्त करतो. हीच तिच्यातली विद्वत्ता तिला बाजी मारून देऊ लागली आणि आंतरराष्ट्रीय पटलावर ती स्टार खेळाडू म्हणून मिरवू लागली. कोणत्याही मैदानी खेळामध्ये फिटनेस महत्त्वाचा असतो, तितकाच तो टेनिसमध्येही गरजेचा. मनगटी जोरावर खेळल्या जाणाऱ्या या खेळात फोर आर्म्स, खांद्यातील जोर यांना अधिक महत्त्व, त्यासोबतच शरीराच्या हालचाली विशेष गरजेच्या. फिटनेसच्या या सर्वच आघाड्यांवर सानिया खरी उतरली.ती मानसिकदृष्ट्या प्रचंड स्ट्राँग, हे स्ट्राँगपण तिच्या खेळातही झळकू लागले. ज्या काळात सानियाने चमकदार कामगिरी करायला सुरुवात केली, तेव्हा जगात प्रसिद्धीझोतात असलेला टेनिस खेळ क्रिकेटवेड्या भारतात मात्र दुर्लक्षित म्हणण्यासारखा होता. देशातील चाहत्यांना टेनिसकडे वळविणारी महिला खेळाडू म्हणूनही सानियाकडे पाहिले जाते. अलीकडच्या काही वर्षांत भारतात टेनिसने मनोरंजन झाले असे म्हणण्यापेक्षा देशाला टेनिस जगतात महिला खेळाडू म्हणून सानियाने मोठे केले. देशातील घराघरांत तिने टेनिस खेळ पोहोचवला. अनेकांना टीव्हीसमोर बसण्यास प्रवृत्त केले. सौंदर्याची चमक तिच्या खेळातही विलसत होती. ती कोर्टावर वावरायची. पॉइंट मिळवल्यावर तिचे हातवारे, रिॲक्शन प्रेक्षकांना आपलेसे करून जाते. भारतीय संस्कृतीवर धर्माचा पगडा पूर्वापार चालत आलेला आहे. आपण कितीही सुशिक्षित अस-लो, तरी तो अधूनमधून डोकावतच असतो. ठरावीक धर्माच्या मुलींनी घराबाहेर पडू नये, त्यांनी धार्मिक पोषखातच वावरायला हवे असा अघोषित नियमच. पण त्यालाही भेदून, अनेकांची टीका झेलून सानियाने कमी कपड्यातल्या टेनिसमध्ये विलक्षण खेळ करत आपल्या खेळानेच चोख उत्तर दिले. त्यामुळे सानियातल्या सौंदर्याबरोबरच तिच्या खेळातले, बिनधास्तपणातले, टेनिस विद्वत्तेतले सौंदर्यच अधिकच विहंगम आहे.

# राजाभोज जयंतीनिमित्त भव्य रॅलीचे आयोजन ४ रोजी

**गोंदिया :** पोवार समाजाचे आराध्य दैवत चक्रवती सम्राट राजाभोज यांची जयंती वसंत पंचमी पर्वावर साजरी करण्यात येते. यंदाही वसंत पंचमीच्या पर्वावर शहरात पवार प्रगतीशील मंच गोंदिया, फुलचूर, छोटा गोंदिया, मुरी, कुडवा, सूर्याटोला आदी गावात राजाभोज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून शहरात या गावातील समाज संघटेच्या वतीने भव्य रॅलीचे आयोजन ४ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे.

छत्रिय चक्रवती सम्राज राजाभोज यांचे जयंती पर्व वसंत पंचमीपासून सुरू झाले आहे. जिल्ह्यातील अनेक गावात समाज संघटनेच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करून जयंती पर्व साजरा करण्यात येत आहे. त्यातच गोंदिया शहरात लगतच्या गावांना घेवून येत्या ४ फेब्रुवारी रोजी भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पवार प्रगतीशील मंच गोंदिया, फुलचूर, छोटा गोंदिया, मुरी, कुडवा, सूर्याटोला आदी गावात राजाभोज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून शहरात या गावातील समाज संघटेच्या वतीने भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. फुलचूर येथे चक्रवती पोवार समाज संघटने फुलचूरच्या वतीने ४ व ५ फेब्रुवारी रोजी दोन दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ५ फेब्रुवारी रोजी संगीत खुसी, हळदी-कुंकू, जागरण व महाप्रसादाचे कार्यक्रम ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन जि.प. सभापती संजयसिंह टेंभरे करणार आहेत. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले राहणार आहेत. कार्यक्रमाचे दिप प्रज्वलन पं.स.सभापती मुनेश रहांगडाले, पं.स.सदस्य स्नेह गौतम यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी मुख्य अतिथी म्हणून पं.स. उपसभापती देवरी अनिल बिसेन, प्रगतीशील मंच अध्यक्ष ॲड पृथ्वीराज चव्हाण, महिला अध्यक्ष ईशा गौतम, वडेगाव सरपंच अंजु बिसेन, सरपंच कुलदीप पटले, ह.भ.प. एम.ए. ठाकुर, संजना पटले, माणिकचंद बिसेन उपस्थित राहणार आहेत. समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आव्हान आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# बेलुऱ्यातील सत्यशोधक



सतीश जामोदकर
अखंड १२८,चंद्रावतीनगर,साईनगरजवळ
अमरावती मो.९४२३३७४६७८

विदर्भातील अमरावती जिल्हा, जिल्ह्यातील अचलपूर या तहसील-पासून जवळच असणारे सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी वसलेले करजगाव सत्यशोधक चळवळीचे केंद्र होते. सत्यशोधक समाजाची अधिकृत प्रथम शाखा येथेच स्थापन झाली होती. त्याचप्रमाणे अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुकासुद्धा सत्यशोधक ब्राम्हणेत्तर चळवळीचा एकेकाळी बालेकिल्ला होता. या तालुक्यातील यशवंतराव खुशालराव देशमुख, काशीराव बापू देशमुख, नानासाहेब उर्फ नारायणराव अमृतकर वकील व यादवराव शामराव गुंड यासारखे सत्यशोधक समाजाचे बिनीचे शिलेदार होते. अमरावती हे पश्चिम विदर्भातील शिक्षणाचे माहेरघर, क्रांतीकारक नाऊसाहेब पंजाबराव देशांची श्री शिवाजी शिक्षण संस्था महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक व राजकीय वारसा चालविणारी शिक्षणकेंद्री संस्था, प्रबोधनाचे चालते बोलते विद्यापीठ असणारे गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाने प्रभावीत झालेला परिसर म्हणजे मोर्शी तालुका, जिल्ह्यातील खेड्यापाड्यात परसलेले विसाव्या शतकांच्या पूर्वापत पोहच-लेले सत्यशोधक चळवळीचे कार्य, करजगाव, सिरजगाव (कसबा) शिरजगार बंड, बेलुरा, नायगाव, मंगरुळ दस्तगीर, दाढी, पुर्णानगर, वाठोडा शुकलेश्वर, राजना (पूर्णा) अशा कितीतरी खेड्यातून सत्यशोधकी विचारांचे आंदोलन पेटलेले दिसते. गावा-गावात ब्राम्हणांवर बहिष्कार, विधी संबंधीचे कोर्टात खटले, ब्राम्हणेत्तरांनी आपला हक्क म्हणून केलेले दावे. अशा अनेक आठवणींच्या विस्मृतीत चाललेल्या खाणाखुणा पण रूजलेली पाळेमुळे आजही पहावयास मिळतात.

बेलुरा हे असेच पुर्वीच्या मोर्शी तालुक्यातील व आजच्या चांदुरबाजार तालुक्यात समाविष्ट असलेले, पेढी नदीवर वसलेले आणि महानुभाव पंथीयांचे प्रेरणास्थान असलेल्या रिद्धपूर पासून साधारण पाचेक कि.मी. अंतरावर असण-ारे, १९६१ च्या गॅझेटियरनुसार त्यावेळी तीन हजार लोकसंख्या आलेल्या व आता जवळपास ८-९ हजारांपर्यंत लोकसंख्या असलेले, महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू यशवंतराव सुशालराव देशमुख एकेकाळी सत्यशोधक चळवळीने भरलेले बेलुरा तालुक्यातील सर्वात मोठे सामुदायिक केंद्र, तालुक्यात साक्षरतेत सर्वोच्च असण-ारे यशवंतराव खुशालराव देशमुख यांनी या गावात सत्यशोधक चळवळ रुजविली. त्यांना साथ दिली ती राजाराम भगवानजी डवरे, सेक्रेटरी सत्यशोधक समाज १९०२ च्या अभियोगात सोबत होते. कृष्णाजी सोनाजी (कोरडे) राऊत अशी मंडळी, तर पुढे १९२५ नंतर चंपतराव यशवंतराव डवरे, आनंदराव लदके, उत्तमराव नथ्थुजी खोंड, शंकरराव विधाते, अजाबराव राऊत व नलिनीताई लढके इत्यादींनी सत्यशोधक विचाराची पताका खांद्यावर घेऊन तिच्या विचार-आचारांचा प्रसार-प्रचार केला. पैकी प्रस्तुत लेखाच्या लेखकाने यशवंतराव खुशालराव देशमुख यांच्यावर प्रदीर्घ लेख लिहिला असून आनंदाव लढके व स्वतंत्र पुस्तके प्रकाशित आहेत. खरे तर हे गाव जसे महात्मा जोतीराव फुलेंच्या, विचाराने प्रभावीत आहे, तसेच हे स्वातंत्र्य चळवळीत मोठ्या संख्येने सहभागी होते. कम्युनिस्ट चळवळीचे आंदोलक भाई मधुकर उतखडे हे सुद्धा याच या गावाचे विधान परिषदेत सर्वाधिक वेळा निवडून येणारे पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार बी.टी. देशमुखांचे हे गाव आहे. तसेच प्रहार संघटनेचे संस्थापक, लोकप्रिय आमदार बच्चू कडू याच गावातील, अशी कितीतरी ज्ञात-अज्ञात मंडळी या गावात जन्मली व कार्यकर्तृत्वाने मोठी झाली अशा मोठ्या माणसांचे गाव म्हणजे बेलुरा होय.

### कृष्णाजी सोनाजी (चिमणाजी) माळी

यशवंतराव खुशालराव देशमुख, राजारामजी भगवानजी डवरे, हरिभाऊ गोपी महानुभाव, कृष्णाजी सोनाजी माळी, उन्माजी, श्रावणजी, जाणुजी वगैरे बेलुरा यांचेवर सन १९०२ साली मोर्शीच्या दिवाणी कोर्टात मुकदमा नं.८३० अ ९७ चा दावा जनार्दन. नारायण भट जोशी याने ब्राह्मणेतरांनी केलेला विधीसंबंधी तसेच दक्षिणासंबंधी दावा अमरावती कोर्टात होता. त्यांचा निकाल भटांच्या विरुद्ध लागला होता. त्याचे स्पेशल अपील नागपूर हायकोर्टात केले. त्याचाही निकाल वरील तिघांच्या बाजूने लागला. कृष्णाजीच्या वडीलांचे नाव सोन-ाजी असे दाखविले असले तरी नाव चिमणाजी होते. कोरडे याची परंपरा असल्यामुळे त्यांना कोरडे म्हणूनही ओळखल जात असे. प्रत्यक्षात त्यांचे आडनाव राऊत होते.

सत्यशोधक समाजाचे उपदेशक कवी भीमराव विठ्ठल महामुनी मुंबईकर याना कसबे बेलोरा येथील सत्यशोधक समाजामार्फत ता.१ जानेवारी सन १९०५ रोजी रात्री जो तमाशा (जलसा) झाला. त्याबद्दल दिलेल्या सर्टिफिकेटमध्ये सुद्धा कृष्णाजींचे नाव आहे. ते व्यवसायाने शिक्षक म्हणून सुद्धा काम करीत. त्यांना तीन भाऊ होते. त्यापैकी कृष्णाजी दोन क्रमांकाचे, त्यांचे बंधू बालाजी यांची मुलगी मंजुराबाई प्रस्तुत लेख लेखकाच्या राजना-पूर्णा गावात माणिकराव देवराव जानोदकर पाटील यांच्याकडे दिली होती. यांचा जन्म सुमारे १८८३ ला झाला असावा, तर मृत्यू १९३० ला झाला. ते सातवी पास होते. ते बापूराव दर्याजी देशमुख यांच्याकडे दिवानजी होते. त्यांना सात मुले व तीन मुली होत्या. त्यांच्या नातव-ाचा मुलगा अजय उत्तमराव राऊत सत्यशोधक विचाराने कार्य करतो.

### राजारामजी भगवानजी डवरे

राजारामजी भगवानजी डवरे हे यशवंतराव बापू देशमुख यांचे सत्यशोधक सहकारी होते. सत्यशोधक मताप्रमाणे लग्न व इतर विधी करण्याच्या संदर्भात नुकसान भरपाई देण्याकरिता जनार्दन नारायण भट यांनी जो दावा टाकला होता त्या महाअभियोगात राजारामजी भगवानजी डवरेंचे नाव होते.

राजारामजी यांना मुलीच होत्या. त्यांना यशवंतराव नावाचे एक भाऊ होते त्यांचे पुतणे चंपतराव हे सत्यशोधक ब्रामणेत्तर चळवळीत पुढे समाविष्ट झाले होते. त्याचप्रमाणे शंकरराव डवरे हे सुद्धा पेटीवादक म्हणून काम करीत होते. भिमरावजी विठ्ठल महामुनी हे सत्यशोधक समाजाचे उपदेशक यांचा जलसा बेलोरा येथे संपन्न झाला. त्यानिमित्त देण्यात आलेल्या सर्टिफिकेटांवर सत्यसाधक समाज बेलोरा शाखेचे सेक्रेटरी म्हणून त्यांचा उल्लेख आहे.

### नथ्थुजी आनंदराव खोंड

नथ्थुजी आनंदराव खोंड यांचा जन्म मूळ शर्यतपूर या गावी झाला. शर्यतपूर हे आज बेलोरा ग्रामपंचायतमध्ये मोडले जाते. पुर्वी बेलोरा गावात शाळा आली. त्यानंतर ती शाळा चालावी म्हणून आजुबाजूची सरहद्दीवरील गावे त्यात सहभागी करुन घेतल्या गेली. असे एकवीस गावे किंवा मोहल्ले असावेत. त्या सर्वांना आता बेल्लुरा म्हटल्या जाते. नथ्थुजी आनंदराव खोंड हे यशवंतराव बापू देशमलख यांच्या तालमीत तयार झालेले सत्यशोधक होते. त्यांचा जन्म ०२ नोव्हेंबर १९७९ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले होते. व्यवसायाने ते शेतकरी होते. बेलुरा गावात दोन जलसे होते. त्यापैकी एका जलशात नथ्थुजी खोंड, शंकरराव विधाते व गुलाबराव चौधरी काम करीत होते. ते जलशात सत्याजीचे पात्र करीत असत. त्यांचे निधन ११ डिसेंबर १९७९ साली झाले. सत्याहत्तर वर्षे ते जगले. त्यांचा मुलगा भागवतराव नथ्थुजी हे सुद्धा नाटकातम काम करीत असत. ते व्यवसायाने शिक्षक होते. त्यांची जन्मतारीख जवळपास एक्यांशी वर्षाचे होते. नथ्थुजी खोड काही काळ बेलुरा गावचे पाटील सुद्धा होते.

### शंकरराव मोतीरामजी विधाते

शंकरराव मोतीरामजी विधाते, नथ्थुजी आनंदराव खोंड व गुलाबराव चौधरी हे एकाच जलशामध्ये काम करीत होते. शंकरराव यांचा जन्म ०५ ऑक्टोबर १९०५ साली बेलुरा या गावी झाला. ते व्यवसायाने ब्रिटीश काळात रेव्हेन्यु इन्स्पेक्टर म्हणून कार्यरत होते. त्यांचे शिक्षण सातवा वर्ग इतके होते. यांना रामकृष्ण, दिलीप व अशोकराव असे तीन मुले असून रामकृष्ण हे १९६४ ला नागपूर युर्निव्हर्सिटीचे अध्यक्ष होते. दिलीपराव जि.प. प्राथमिक शाळेत शिक्षक होते, तर अशोकराव गावात शेती करतात. शंकररावांच्या घरासमोरील मोकळ्या जागेत आनंदराव लढके व नलिनीताई यांच्या आंतरजातीय विवाहाची बैठक काही सत्यशोधक मंडळींनी याच ठिकाणी घेतली होती. त्यांचा मृत्यू १८ फेब्रुवारी १९४६ ला झाला. अशी माहिती त्यांचे चिरंजीव दिलीपराव यांनी दिली होती.

### अजाबराव कृष्णराव राऊत

नथ्थुजी खोंड, शंकरराव विधाते, गुलाबराव चौधरी यांच्या समवेत अजाबराव कृष्णराव राऊत व शामराव नारायणजी राऊत हे सुद्धा सत्यशोधक चळवळीत काम करीत होते. अजाबराव हे सत्यशोधक कृष्णराव राऊत यांचे चिरंजीव होते. शामराव नारायणजी राऊत हे कृष्णराव राऊत यांचे पुतणे होत. आनंदराव तडकेंच्या घराशेजारी यांची घरे होती.

अजाबराव हे आनंदराव लढकेंचे परममित्र होते. सत्यशोधक आनंदराव लढके व नलिनीताई लढके यांचा आंतरजातीय विवाह लावण्यात त्यांनी मोठा हातभार लावला होता. त्यांच्याच सहकार्याने त्यांच्याच घराजवळील वाड्यात तो संपन्न झाला होता. त्यांचे चिरंजीव धनंजय हयात असून त्यांचा मुलगा सुशील धनंजय राऊत हा वकील आहे. त्यांची मुलगी अजाबरावांची ताई ही ग्रामगीताचार्य तुकारामदादा यांची भावसून आहे.

### चंपतराव यशवंतराव डवरे

चंपतराव यशवंतराव डवरे हे राजारामजी भगवानजी डवरे यांचे पुतणे होते. त्यांना आण्याजी या नावानेसुद्धा ओळखले जात होते. चंपतरावांचा जन्म अंदाजे १९८६ चा असावा. चंपतराव डवरे यांचा सत्यशोधक चळवळीचा पुर्वीचा वारसा असला तरी त्यांचा खऱ्या अर्थाने संबंध आला तो १९२५ साली. ज्यावेळी अमरावती येथे ब्राह्मणेत्तर सत्यशोधक परिषदांसह पाच परिषदा एकाचवेळी झाल्या होत्या. त्या परिषदेत त्यांनी स्वयंसेवकांच्या भूमिकेत आपली बहुमोल कामगिरी बजावली होती. त्यांच्या समवेत आनंदराव लढके सुद्धा होते. चंपतराव यांना स्वयंसेवकाचे कप्तान म्हणून निवडले होते. हे त्यांना त्यावेळी परिषदेच्या अध्यक्षांच्या हस्ते मिळालेल्या पदकावरुन कळते. त्या सोनेरी पदकावर कोरलेला मजकूर असा. presented by the Honer-able The Raja of Bagbal chief Minister Madrass Government President All india Non Brahmin Congress to Mr.Chanpatrao Yeswantrao Daware L.B.M. Captain of the Volunters Non Brahmin Congress Amaraoti December १९२५ ब्राह्मणेत्तर कॉंग्रेसच्यावतीने हे त्यांना मिळाले होते. सदर पक आजही त्यांचा मुलगा सुभाषराव यांचेकडे आहे. ते प्रस्तुत लेखाच्या लेखकाला चंपतराव यांचे नातू अनुभव सुभाषराव यांनी दाखविले होते. सुभाषरावांचे भाऊ व चंपतरावांचे चिरंजीव विष्णूपंत यांना अजूनही जलशातील काही पदे आठवतात. त्यांचा मृत्यू २१ सप्टेंबर १९६३ ला झाला. त्यांचे मोठे चिरंजीव छत्रपती यांनी केशवराव जेधे, शंकरराव मोरे यांना पाहिलेले ते सांगतात.

### उपसंहार:

नव्याने प्राप्त झालेल्या सत्यशोधकांच्या जीवनकार्याचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखातून थोडक्यात देत आहोत सत्यशोधक ब्राह्मणेत्तर चळवळीतील खंदे कार्यकर्ते आज काळाच्या ओघात विस्मृतीत जात आहेत. त्यांच्या कार्याच्या पाऊलखुणाही पुसटच नव्हे तर पूर्णत: पुसल्या जात आहेत. त्याची चिन्हेही सापडणे दुरापास्त होत आहे. अशा काळात तुटपुंज्या माहितीच्या आधारावर सत्यशोधकांची नोंद घेणे नवीन पिढीसाठी आवश्यक ठरते.

# नवेगावबांध मध्ये प्रचंड गाळ

**गोंदिया:** नवेगावबांध जलाशय साडेचारशे वर्षे जुने माजी माल-गुजारी तलाव आहे. या तलावाच्या चारही बाजूंना जंगल आहे. त्यामुळे जंगलातील गाळ दरवर्षे साचून येतो. परंतु गाळ काढण्याचा अद्यापही मुहूर्त मिळाला नाही. त्यातच बुडीत क्षेत्रात अतिक्रमण झाल्यामुळे सद्यस्थितीत फक्त ८०० बुडीत क्षेत्र उपलब्ध आहे. त्यामुळे तलावात आजघडीला ४४२५०० घनमीटर गाळ साचला असावा, असा अंदाज तज्ञांनी व्यक्त केला आहे. यामुळे तलावाचे अस्तित्व धोक्यात येणार असल्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे.

साडेचारशे वर्षापासून कधीही नवेगावबांध तलावाचे गाळ उपसण्याचे काम करण्यात आले नाही. त्यामुळे या तलावात गाळ साठण्याचे प्रमाण खूप वाढले. लाखो टन गाळ यात साचले आहे. या तलावाचे खोलीकरण करुन गाळ काढण्याचे काम शासनाने ताबडतोब हाती घ्यावे, अशी मागणी नवेगावबांधसह पाच गावातील निस्तर हक्क प्राप्त गावकऱ्यांनी केली आहे. अठराव्या शतकात कोलू उर्फ कवळू पाटील डोंगरवार यांनी सात पर्वतरागांच्या मध्यला भागात या तलावाची निर्मिती केली. अपूर्ण राहिलेले बांधकाम त्यांचे सुपुत्र नवेगावबांधचे मालग-ुजार सिताराम पाटील डोंगरवार यांनी पूर्ण केले. केवळ शेतीसाठी सिंचन



यासाठी या तलावाची निर्मिती झाली आहे. गट क्रमांक १२९२ असून या तलावाचे बुडीत क्षेत्र आराजी १२२७.६६ हेक्टर आ एवढे आहे. या जलाशयाचे पाणलोट क्षेत्र ५६९८ हेक्टर आर एवढे आहे. १०३४ हेक्टर आर बुडीत क्षेत्र आहे.

१९७१ ला महाराष्ट्र शासनाने येथील निसर्ग वैभव व नैसर्गिक सौंदर्य लक्षात घेऊन राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा या तलावाला व परिसराला दिला. पर्यावरणाचा बागुलबुवा करुन पर्यटन विकासाच्या कामात काही स्वयंघोषित पर्यावरणवादी अडसर आणत आहेत. तलावातील गाळ उपसण्यासाठी तलावाचे खोलीकरण करण्यासाठी शासनाने वेळीच पावले उचलावी. यासाठी नवेगावबांध ग्रामपंचायतीच्या आमसभेने ठराव पारित केला आहे. त्यामुळे परिसरातील हजारो मजुरांना देखील रोहयोच्या माध्यमातून बेकार हातांना कामही मिळेल. दुसरीकडे तलावाच्या बुडीत क्षेत्रात किनाऱ्यालगतच्या गावांनी लोकांनी बुडीत क्षेत्रात अतिक्रमण करुन शेतजमिनी काढल्या. या बुडीत क्षेत्रात रामपुरी, एलोडी, जांभळी, पवनी, धाबेटेकडी आणि रांजीटोला कोहळीटोला आदि गावातील लोकांनी या बुडीत क्षेत्रात अतिक्रमण केल्यामुळे आता फक्त ८०० हेक्टर बुडीत क्षेत्र उपलब्ध आहे.

१७७० हेक्टर आर जंगल क्षेत्रातून तलावात गाळ वाहून येतो. या शंभर वर्षात विचार केला तर आजमितीला या तलावात ४४,२५०० घनमीटर गाळ साचला असावा, असा धक्कादायक अंदाज तज्ञांनी व्यक्त केला आहे. हे जलाशय यंदा ओव्हरफ्लो झाले. गाळ साठला असल्यामुळे हे तलाव आता लवकरच भरते व उन्हाळ्यात पाणीसाठा लवकरच संपतो. त्यामुळे नवेगावबांध येथील नागरिकांना उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भासत असते. परिणामी, या तलावातील जलसाठा दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे सिंचन व पिण्यासाठी पाण्याच्या टंचाईचा सामना परिसरातील जनतेला करावा लागत आहे.

### सिंचनावरही फरक

गेल्या चार वर्षापासून नवेगावबांध तलावावर अवलंबून असलेल्या नवेगावबांधसह पाच निस्तारहक्क गावातील शेतकऱ्यांना रब्बी व खरीप हंगामासाठी सिंचनासाठी पाणी उपलब्ध होऊ शकले नाही. तसेच यावर्षी उन्हाळ्यात नवेगावबांध परिसरात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवली. तलाव, बोड्या, बोरवेल, विहीर यातील पाणी आटले होते. मृतसाठाच शिल्लक राहिला होता. जनावरांना व नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईचा सामना करावा लागला होता. कालव्यातून पाणी निघत नसल्यामुळे या मृत साठ्यातून मोटारपंप ला-वून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा नवेगावबांधवासियांना करण्यात आला होता. सिंचन व पिण्याच्या पाण्याची टंचाई दिवसेंदिवस जाणवत आहेश्र. याकडे वेळीच लक्ष दिले नाही तर पुढे परिसरात सिंचन व पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाईसा सामना करावा लागेल.

# कचारगड यात्रेनिमित्त वाहतूक व्यवस्थेत बदल अधिसूचना निर्गमित

**गोंदिया:** कचारगड यात्रेनिमित्त आमगांव - सालेकसा- डोंगरगढ (छ.ग.) या मार्गाने मोठया प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक होत असते. सुरक्षिततेच्या दृष्टीने भाविकांच्या जीवितास धोका होवू नये याकरीता आमगांव - सालेकसा डोंगरगढ (छ.ग.) या मार्गाने ये-जा करणारी अवजड वाहने (एस.टी. बसेस, टप्पा वाहतूकीचा परवाना असलेली खाजगी प्रवाशी वाहने, ॲम्बुलन्स, स्कुल बसेस, अग्निशमन दलाची वाहने, पोलीस वाहने, शासकिय मालकीची वाहने वगळुन) यांच्या आवागमनास ०३ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ०५.०० वा. ते ०७ फेब्रुवारी २०२३ रोजी १९.०० वा. पर्यत जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी तात्पुरते मनाई आदेश जारी केले आहेत.

जिल्ह्यातील पो.स्टे. सालेकसा हद्दीत मौजा कचारगड (धनेगांव) येथे ०३ फेब्रुवारी २०२३ ते ०७ फेब्रुवारी २०२३ पर्यत ङ्गमहाकाली कंकाली कोपरलिंगाङ्क यात्रा होणार आहे. सदर यात्रेमध्ये महाराष्ट्र, मध्यप्रदेश व छत्तीसगड राज्यातील भाविक मोठ्या संख्येने येतात. सदर ठिकाणी भाविकांची व त्यांचे वाहनांची प्रचंड गदी होत असते. आमगांव - सालेकसा- डोंगरगढ (छ.ग.) या मार्गाने मोठया प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक होत असते. त्यामुळे अवजड वाहनांमुळे यात्रेतील लोकांची गैरसोय होऊन गंभीर स्वरुपाचा अपघात होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यानुसार सदर यात्रेदरम्यान सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने भाविकांच्या जीवितास धोका होवू नये याकरीता आमगांव - सालेकसा डोंगरगढ (छ.ग.) या मार्गाने ये-जा करणारी अवजड वाहने (एस.टी. बसेस, टप्पा वाहतूकीचा परवाना असलेली खाजगी प्रवाशी वाहने, ॲम्बुलन्स, स्कुल बसेस, अग्निशमन दलाची वाहने, पोलीस वाहने, शासकिय मालकीची वाहने वगळुन) यांच्या आ-वागमनास ०३ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ०५.०० वा. ते ०७ फेब्रुवारी २०२३ रोजी १९.०० वा. पर्यत तात्पुरते मनाई आदेश जारी करण्यात येत आहे. उपरोक्त नमूद कालावधीत मनाई करण्यात आलेल्या अवजड वाहनांना आमगांव देवरी - डोंगरगढ (छ.ग.) या पर्यायी मार्गाने आवागमन करण्याचे आदेश जारी करण्यात येत आहे.

# राजकारणातून समाजकारण करणारे तपस्वी श्रद्धेय लक्ष्मणराव मानकर गुरुजी

एक शिक्षक, परिपक्व राजनेता आणि महाराष्ट्राच्या पुर्वोत्तर सिमेला असलेल्या गोंदिया, भंडारा परिसरातील एक अद्वितीय वयक्तिमत्व, सर्वसामान्यांचा हक्काचा माणूस व सम्मानीय व्यक्तिमत्व म्हणजेच श्रद्धेय लक्ष्मणराव मानकर गुरुजी.

गोरगरिबांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांना स्वाभिमानाने जीवन व्यतित करण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही याची जाणीव दृरदृष्टी असलेल्या श्रद्धेय गुरुजींना झाली व सर्व शक्तीनिशी या भागाचा कायापालट करण्यासाठी गुरुजी पुढे सरसावले राजकारण व समाजकारण या दोन्ही पातळ्यांवर काम करीत महाराष्ट्राच्या टोकावर असलेल्या या दुर्गम भागातील शिक्षणाची गती गुरुजींनी वाढवली व खऱ्या अर्थाने शिक्षण महर्षी ठरले.

आँखो मे मंजिले थी
गिरे और संभलते रहे !
आंधियों में क्या ादम था
चिराग हवा में भी जलते रहे !

श्रद्धेय गुरुजींचा जन्म तुमखेडा खुर्द या गावी दि.४ फेब्रुवारी १९२९ ला झाला. आई गोदुबाई व वडील बिसनजी मानकर हे अत्यंत मनमिळावू स्वभावाचे होते. हा वारसा गुरुजींनी आयुष्यभरासाठी अंगिकारला. मानकर गुरुजी शिक्षणात हूशार होते, तसेच खेळातही प्रविण होते. कबड्डी व फुटबॉल हे त्यांचे आवडते खेळ होते.

श्रद्धेय गुरुजी हे संघाचे निष्ठावान स्वयंसेवक होते. १९४८ मध्ये संघावर प्रतिबंध लावण्यात आला. संघाने देशव्यापी सत्याग्रह सुरु केला. त्यावेळेस गुरुजी २० वर्षाचे होते. सत्याग्रह सुरु होताच त्यांनी भूमिगत, आंदोलनात भाग घेतला. दि.११ जुलै १९४९ ला संघावरील बंदी उठविण्याचा आदेश शासनाने जारी केला. या आंदोलनातील धडाधडीच्या कार्यामुळेच १९५० मध्ये रा.स्व.संघ आमगाव मंडळ कार्यवाह व १९५१ मध्ये गोंदिया तालुका कार्यवाह ही जबाबदारी गुरुजींवर सोपविण्यात आली. पुढे भंडारा जिल्हा जनसंघाच्या प्रचार कार्याची धुरा गुरुजींच्या खांद्यावर आली.

१९५० मध्ये मॅट्रीक झाल्यानंतर गुरुजींनी आपले संपूर्ण आयुष्य ज्ञान प्रसारासाठी खर्च केले. आमगांव सारख्या दुर्गम व मागासलेल्या क्षेत्रातील, तळागळातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी भवभुती शिक्षण संस्थेची स्थापना केली. आमगांव येथे आदर्श विद्यालयाचा प्रारंभ करुन



प्रतिभाशाली व गुणसंपन्न नागरिक तयार केले. १९६२ मधये चोपा येथे रविंद्र विद्यालय तसेच १९६९ मध्ये आमगांव येथे भवभुती महाविद्यालय सुरु केले. या महाविद्यालयामध्ये आर्ट, कॉमर्स व विज्ञान या शाखा असून येथे पी.एच.डी. पर्यतच्या शिक्षणाची सोय करण्यात आलेली आहे. १९७० मध्ये कुऱ्हाडी येथे राम कृष्ण विद्यालय, १९८७ मध्ये फार्मसी कॉलेज सुरु केले ज्यामुळे आज या भागाती विद्यार्थ्यांना सन्मानाने रोजगार उपलब्ध होत आहे.

पुढे गुरुजींच्या पाऊलावर पाऊल ठेवत त्यांचे सुपुत्र केशवराव मानकर यांनी सुरेशबाबू असाटी, प्रमोद कटकवार, डॉ.डी.के. संधी यांच्या सहकार्याने बी.एड, डी.एड. पॉलीटेक्नीक व आय.टी.आय. सारखे व्यावसायीक अभ्यासक्रम सुरु करुन या भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करुन दिल्या. या शाखांमधून पॉलीटेक्नीक फार्मसी व आयटीआय या शाखांना आय.एस.ओ. ९००१-२०१५ ने प्रमाणित केलेले आहे.

शैक्षणिक क्रांती करीत असतांनाच गुरुजींची राजकीय वाटचाल जोमाने बहरत होती. कुशल संघटक म्हणून त्यांची ओळख वाढत होती. दोनदाा पार्टीचे उपाध्यक्षपद सांभाळून विदर्भातील पक्षसंघटना मजबूत केली. १९६७ ला विधानसभेवर निवडून गेले. १९७४ ला पक्षाने त्यांना विधान परिषदेवर पाठविले. १९७७ मध्ये ते लोकसभेवर निवडून गेले. परंतु कधीही पदाचा गर्व त्यांना शिवला नाही. पदाचा मोह त्यांनी कधी केला नाही. ते निस्वार्थ भावनेने सेवा करीत होते. त्यांचे साधे जीवन व तेजोमय दैदिव्यमान कार्य पाहून अनेकांना प्रेरणा मिळत राहणार. गुरुजी तुम्ही आम्हा सर्वांना शिकवण दिली की,

आदमी साधनो से नही
साधना से श्रेष्ठ बनता है !
आदमी भवनो से नही
भावना के श्रेष्ठ बनता है !
आदमी उच्चारण से नही
उच्च-आचरण से श्रेष्ठ बनता है !

आज गुरुजी आापल्यात नाहीत, परंतु त्यांचे जीवन, त्यांची कार्यशैली, त्यांचे साधेपण व त्यांचा मनमिळावूणा, त्यांनी केलेले अथक कार्य, त्यांचे राजकीय व शैक्षणिक योगदान या क्षेत्रातील जनता कधीही विसरणार नाही. गुरुजींच्या सेवेचा हा वारसा त्यांचे सुपुत्र संस्थेचे कार्यवाह व माजी आमदाार केशवराव मानकर समर्थपणे सांभाळत आहेत. संस्थेच्या विकास व जनकल्याणासाठी ते कटीबद्ध आहेत. गुरुजींच्या प्रेरणा व आशीर्वादाने या भागाचा उत्तरोत्तर विकास होत राहो. एवढीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# जल,जंगल व जमिनीचा वारसा जपण्याचा संकल्प करू या-जिल्हाधिकारी

●जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण ●प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**गोंदिया :** प्रजासत्ताक दिन साजरा करतांना आपल्या कर्तव्याचे सदैव पालन करण्याचा संकल्प करु या. जल, जंगल व जमीनीचे जतन करु या. समाजात एकोपा व बंधूभाव वृध्दींगत करुया. आपल्या जिल्ह्याला वनाचा व जलाचा मोठा वारसा लाभला आहे, तो जतन करणे आपले कर्तव्य आहे. आपला वन व जलवारसा जपण्यासाठी आज प्रजासत्ताक दिनी संकल्प करु या, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले. पोलीस मुख्यालय येथे प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य समारोहात जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले या प्रसंगी ते बोलत होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी, उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.कुसूमाकर घोरपडे, जिल्हा प्रशासन अधिकारी करणकुमार चव्हाण यांचेसह शालेय विद्यार्थी व नागरीक बहुसंख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्यानंतर घटना समिती स्थापन करण्यात आली. त्यामध्ये मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. बाबासाहेबांनी देशाला एक आदर्श राज्यघटना दिली. २६ जानेवारी १९५० रोजी स्वीकारलेल्या राज्यघटनेत कोट्यावधी देशवासियांच्या आकांक्षाचे प्रतिबिंब आहे. आदर्श राज्य घटनेमुळेच भारत देश सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक गणराज्य बनला असे ते म्हणाले.

स्वातंत्र्य, समता, बंधूभाव व सर्वांसाठी समान न्याय या तत्वांशी बांधिलकी ठेवून आपण कल्याणकारी राज्याची संकल्पना मान्य केली व ती अंमलात आणली. राज्यघटनेमुळेच देशाला लोकशाही व्यवस्था मिळाली. जगातील श्रेष्ठ राज्यघटनांमध्ये आपल्या देशाच्या राज्यघटनेचा समावेश आहे. ही बाब सर्व भारतीयांसाठी अभिमानाची आहे. कोणत्याही प्रकारच्या जात, धर्म, लिंग व रंग भेदाशिवाय प्रत्येक नागरिकाला मुलभूत अधिकार आपल्याला घटनेने दिले आहेत.

प्रजासत्ताक दिन साजरा करतांना मागे वळून पाहिले असता मागील ७३ वर्षात आपल्या देशाने विविध क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारुन देशाने आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मोठी झेप झेतली आहे. या काळात देशाने आरोग्य क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली. विविध तंत्रज्ञानात आपला देश स्वयंपूर्ण झाला. शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात भारताने जगाचे लक्ष आपल्याकडे वेधले. सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंर्त्य, दर्जाची व संधीची समानता याद्वारे आपला देश प्रगतीची अनेक शिखरे सर करत आहे, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

पायाभूत सोई-सुविधा, रस्ते, दळणवळणाची साधणे, औद्योगिक, संस्था, व्यापार, उद्योग आदि क्षेत्रातही आपण या ७३ वर्षाच्या कालखंडात नेत्रदिपक प्रगती केली. लोककल्याणकारी राज्य (वेलफेअर स्टेट) म्हणून भारत वेगाने पुढे आला आहे. देशाची प्रगती व विकास म्हणजेच सर्वसामान्य माणसाचा विकास आहे. जगाच्या व्यासपीठावर भारत आज अभिमानाने व ताठ मानेने वावरत आहे. याचे श्रेय आपल्या देशाच्या घटनेला निश्चितच आहे.

देशाच्या प्रगतीत महाराष्ट्राचा वाटा सिंहाचा आहे. पुरोगामी व प्रगतराज्य म्हणून महाराष्ट्राचा नावलौकीक आहे. रोजगार हमी सारखी योजना महाराष्ट्राने देशाला दिली. या कालखंडात राज्याने सुध्दा आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, रस्ते, कृषी या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केल्याचे त्यांनी सांगितले.

इतरांच्या मतांचा सन्मान, ज्येष्ठांचा यथोचित आदर व महिलांचा सन्मान यासह आपली संस्कृती व सामाजिक एकता अखंड ठेवण्याला आपले सर्वोच्च प्राधान्य असायला हवे. आपला देश विविध परंपरेने नटलेला आहे. आपण आपल्या देशाला जगात किर्तीमान करण्यासाठी कटिबध्द होऊ या असे आवाहन त्यांनी या प्रसंगी जिल्हावासीयांना केले.

प्रारंभी जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी ध्वजारोहण करुन परेडचे निरीक्षण केले. भारतीय रिझर्व बटालीयन पोलीस दल, महिला पोलीस पथक, गृहरक्षक दल, माजी सैनिक, आर.एस.पी. पथक, स्काऊट-गाईड पथक, पोलीस बॅन्ड पथक, पोलीस श्वान पथक, अग्नीशमन दल यांनी परेड संचलन केले. ध्वजारोहणानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सांस्कृतीक कार्यक्रमात सडक अर्जुनीच्या विद्यार्थ्यांनी गोंडी नृत्य सादर केले. तर श्री गुरुनानक हिन्दी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आमी बेस डान्स व देशभक्ती गीत, लिटल फ्लावर स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सजीकल ॲक्ट डान्स व पिरॅमीक डान्स तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले, त्याचप्रमाणे कुलदिपीका बोरकर यांनी प्रेरणा सभागृहात चित्रकला प्रदर्शनी लावून उपस्थितांची मने जिंकून घेतली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंजुश्री देशपांडे यांनी केले.

# आरएसएसची काळी टोपी घालून जि.प.अध्यक्षांनी केले ध्वजारोहण



**गोंदिया:** भारतीय लोकशाहीची मुल्य कायम टिकून रहावी, यासाठी २६ जानेवारीला भारताने आपला ७४ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा केला गेला. गोंदिया जिल्ह्यातही उत्साहात प्रजासत्ताकदिन साजरा करण्यात आला.मात्र गोंदिया जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय ईमारतीमध्ये ध्वजारोहण करतांना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी काळी टोपी(आरएसएसची टोपी)घालून ध्वजारोहण केल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेत भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसची सयुंक्त सरकार असून आजच्या कार्यक्रमाला जिल्हा परिषद अध्यक्ष वगळता एकही पदाधिकारी उपस्थित नव्हते. विशेष म्हणजे पांढरा ड्रेस व टोपी हा ड्रेसकोड असून काळी टोपी घालणे म्हणजे निषेध पाळण्यासारखे झाले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्यावर मात्र राष्ट्रीय स्वंयसेवकसंघाच्या विचारांचा मोठा प्रभाव असल्यानेच त्यांनी सत्तेतील सहकारी मित्रपक्षांच्या भावनांचाच नव्हे तर ड्रेसकोडलाही बाजूला ठेवून काळीटोपी घालत ध्वजारोहण करण्याची केलेल्या हिमतीवर चर्चांना सुरवात झाली आहे.

ध्वजारोहणानंतर संविधान उद्दिशेकेचे वाचन करण्यात आले.मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती जाखलेकर, उपमुख्यकार्यकारी अधिकारी राजेश भांडारकर, महिला व बालकल्याण उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, जिल्हा पशुसवर्धन अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यकारी अभियंता, मुख्य लेखा वित्त अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांच्यासह इतर विभागाचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषद अध्यक्ष रहांगडाले यांनी काळी टोपी घालून आज विविध ठिकाणी ध्वजारोहण करीत कार्यक्रमाला उपस्थिती लावल्याने त्यांना काय दर्शवायचे असे चर्चा सुरु झाल्या आहेत. तर काही तज्ञांच्या मते काळी टोपी घालून ध्वजारोहण करणे चुकीचे आहे, मात्र त्यांनी आरएसएसच्या तत्वांचे पालन करण्याचे ठरविले असावे असेही बोलू लागले आहेत.

# घाटातून वाळू चोरट्यांकडून १२ लाखांचा मुद्देमाल जप्त



**तिरोडा:** तालुक्यातील घाटकुरोडा घाटातून अवैधरित्या वाळु चोरणाऱ्या दोन आरोपींना पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाने अटक केले. ही कारवाई २९ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास करण्यात आली. यावेळी दोन ट्रॅक्टर ट्रॉलीसह एक ब्रास वाळु असा एकूण १२ लाख ४ हजार रुपयाचां मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन व अवैध धंद्यांवर आळा घालण्याकरिता पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी पिशेष पथकास आदेशित केले होते. त्या अनुषंगाने जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध विशेष धडक मोहीम सुरू आहे. दरम्यान, तिरोडा तालुक्यातील घाटकुरोडा घाट, वैनगंगा नदीच्या पात्रातून काही लोक अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून वाळूची चोरी करून वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाला मिळाली. त्यांनी घाटकुरोडा घाटावर धाड टाकून दोन ट्रॅक्टर ट्रॉलीसह एक ब्रास वाळु असा एकूण १२ लाख ४ हजार रुपयाचां मुद्देमाल जप्त करण्यात केला तसेच आरोपी ट्रॅक्टर चालक विजय फुलचंद खंगार (वय २७, रा. घाटकुरोडा, ता.तिरोडा), दिनकर सुरदास मेर्शाम (वय ३२, रा. घाटकुरोडा, ता. तिरोडा) यांना अटक करुन तिरोडा पोलिसांच्या स्वाधीन केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांच्या आदेशान्वये उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या विशेष पथकातील पोलीस हवालदार सुजित हलमारे, महेश मेहर, पोलीस नायक शैलेश कुमार निनावे, दयाराम घरत, चापोशी हरिकृष्ण राव यांनी केली.

# दवडीपार ग्रामपंचायत येथे सरपंचानी केले ध्वजारोहण

**गोरेगाव:** तालुक्यातील दवडीपार येथे ७४ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.येथील ग्रामपंचायत कार्यालयात नवनिर्वाचित सरपंच बुगलाल कटरे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी उपसरपंच साहेबलाल, नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्य व सर्व आजी- माजी पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विविध सेवा सहकारी कार्यकारी संस्था दवडीपार येथे संस्थेचे अध्यक्ष देवचंद बिसेन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रभुषण चौधरी यांच्यासह संचालक व गावातील महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमृत सरोवर या तलावावर सरपंच परशुरामकर यांच्या हस्ते ध्वजारोहण



**सडक अर्जुनी:** केंद्र आणि राज्य सरकारच्या आदेशानुसार ग्रामपंचायत खोडशिवनी ने अमृत महोत्सवी वर्ष निमित्त प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने अमृत सरोवर या तलाव वर गंगाधर परशुरामकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने केंद्र व राज्य सरकारचे सूचनेनुसार खोडशिवनी येथील गट नंबर १५ मध्ये सुमारे लाख रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या अमृत सरोवर तलाव येथे ध्वजारोहण करावे अशा सूचना पंचायत समिती कडून वेळे वर प्राप्त झाल्यात ग्रामपंचायत खोडशिवनीने त्याची दखल घेऊन अमृत सरोवर तलाव म्हणून बांधण्यात आलेल्या तलावांची यादी रोजगार हमी योजना विभागाकडून मागवली. त्यात जिल्ह्यात असे ७० तलाव बांधण्यात आल्याचे निदर्शनास आले. खोडशिवनी येथेही गट नंबर १५ मध्ये ५ लाख रुपये खर्च करून सदर तलाव अमृत सरोवर म्हणून बांधला असल्याचे समजले. तेव्हा त्या तलावावर ध्वजारोहण करण्याचा निर्णय ग्रामपंचायतनी घेतला.

२६ जानेवारी सकाळी तंटामुक्त समिती जिल्हा परिषद शाळा दामोदर प्राथमिक शाळा सावित्रीबाई मस्के उच्च माध्यमिक शाळा ग्रामपंचायत प्राथमिक आरोग्य केंद्र या सर्व ठिकाणचे ध्वजारोहण आटोपून गावातील नागरिक ग्रामपंचायत सदस्य यांचे समवेत जावून शासनाचे सूचनेनुसार अमृत महोत्सवी वर्ष निमित्त अमृत सरोवर तलाव येथे थाटात ध्वजारोहण सरपंच गंगाधर परशुरामकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी पोलिस पाटील भृंगराज परशुरामकर उपसरपंच नेवारे सोसायटीचे अध्यक्ष उद्धव परशुरामकर सर्व ग्रामपंचायत सदस्य सर्व शाळा शिक्षक, आरोग्य केंद्राचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस व गावातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. हा अभिनव कार्यक्रम असल्याने नागरिकात मोठी उत्सुकता होती.

# विद्यापिठ अभ्यास मंडळावर डॉ. संजीव राहांगडाले

**गोंदिया:-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी यांनी जगत महाविद्यालय गोरेगाव येथील प्राध्यापक डॉ. संजीव राहांगडाले यांची रसायनशास्त्र अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती केलेली आहे.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत तीन सदस्यांची नियुक्ती करावयाची होती. याअंतर्गत डॉ. संजीव रहांगडाले यांची निवड करण्यात आली आहे. नागपूर विद्यापीठ अंतर्गत पदवी अभ्यासक्रम तयार करणे, परीक्षांचे नियंत्रण व मूल्यांकन करणे, विद्यापीठ अंतर्गत रिक्त जागा भरण्यासाठी कार्यवाही करणे यासह आदी कामे त्यांना पार पाडावी लागणार आहेत. डॉ. रहांगडाले यांनी आपल्या

नियुक्तीचे श्रेय संस्थाध्यक्ष जगतरामजी राहांगडाले, सचिव नारायणरावजी येळे, विद्यापीठ शिक्षण मंचाचे अध्यक्ष डॉ. कल्पना पांडे, सचिव सतीश चाफले, नागार्जुन इंजिनिअरिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुरलीधर राहांगडाले, जगत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. वाय. लंजे, ऊपप्राचार्य डॉ. एस. एच. भैरम, प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिले आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल शिशिर कटरे, बबलू कटरे, खेमेंद्र कटरे, भागचंद्र रहांगडाले, महेंद्र बिसेन, पप्पू पटले आदी मित्र मंडळी नी अभिनंदन केले आहे.

# जाती दावा पडताळणी संदर्भात आवश्यक सूचना

**गोंदिया :** सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रात (१२ वी विज्ञान) ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी आरक्षित (अनु.जाती, विजाभज, इमाव व विमाप्र) प्रवर्गातून जाती दावा पडताळणीचे प्रकरण जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया येथे अद्याप पर्यत सादर केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांनी जाती दावा पडताळणी प्रकरण याथाशिघ्र जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया कार्यालयात सादर करावे. उशिरा आलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाही.

ज्या अर्जदारांनी माहे डिसेंबर २०२२ पर्यत जाती दावा पडताळणीचे प्रकरण सादर केले होते (त्रुटी प्रकरणे वगळून) अशा विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात आले असून त्यांचे ई-मेलवर पाठविण्यात आले आहेत. अशा विद्यार्थ्यांनी/अर्जदारांनी आपले जात वैधता प्रमाणपत्र ई-मेलवरुन प्राप्त करुन घ्यावे. तसेच ज्या अर्जदारांनी माहे सप्टेंबर ते डिसेंबर मध्ये प्रकरणे सादर केले होते व ज्यांना अद्याप पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले नाहीत अशा अर्जदारांचे प्रकरणे त्रुटीत असून अशा अर्जदारांना त्यांचे प्रकरणातील त्रुटी ई-मेलवर व पोष्ट पत्राद्वारे कळविण्यात आलेल्या आहेत. तथापी अद्यापही ज्या विद्यार्थ्यांनी त्यांचे जाती दावा पडताळणी प्रकरणात त्रुटी पुर्तता केलेली नाही तसेच ज्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र ई-मेलद्वारे प्राप्त झालेले नाहीत त्या विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी जाती दावा पडताळणी प्रकरणातील त्रुटी संदर्भात आवश्यक पुरावे व कागदपत्रासह दिनांक ३१ जानेवारी २०२३ पर्यंत त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी आयडी वर मुळ स्वरुपात अपलोड करुन त्याच्या प्रती समितीकडे सादर करावे. अर्जदारांनी विहित मुदतीत त्रुटी पुर्तता न केल्यास त्यांचे प्रकरण नस्तीबध्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. असे राजेश पांडे, उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया यांनी कळविले आहे.

# राष्ट्रीय दिन उत्सव समितीच्या वतीने इंगळे चौकात प्रजासत्ताक दिन साजरा





**गोंदिया:** राष्ट्रीय दिन सोहळा समिती आणि सतत सृजन संघर्ष व सर्मपण का सजग प्रहरी संगठन अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने किशोर इंगळे चौकात ७४ वा प्रजासत्ताक दिवस साजरा करण्यात आला. सविता विनेद अग्रवाल यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी आयोजीत कार्यक्रमात प्रामुख्याने राष्ट्रदिन उत्सव उत्सव समिती व संस्थेचे प्रमुख अशोक इंगळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष व अभियान परिवाराचे संरक्षक डॉ घनश्याम तुरकर, एस के वहाब, मधुकरराव नखाते, बार एसोसिएशन चे अध्यक्ष एड. सी के बडे, जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता अनिल जगताप, सामाजिक कार्यकर्ते दुलीचंद बुद्धे, मनोहरराव माने, कैलास भेलावे, पत्रकार जयंत शुक्ला, आशिष वर्मा, मुन्ना साधुराम, भावना कदम, प्रमिला सिंद्रामे, सुनीता हेमणे, पूजा तिवारी, मंजू कटरे, व्ही.पी.बेरकर, जे.एन. बिसेन, संजय बापट, धर्मिष्ठ सेंगर, रिता बागडे आदी मान्यवर उपस्थित होते.


यावेळी पाहुण्यांचा निमंत्रक अशोक इंगळे, डॉ.घनश्याम तुरकर व समिती सदस्यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. समारंभाचे उद्घाटन करताना समन्वयक अशोक इंगळे यांनी प्रास्ताविकात प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. नूतन इंग्लिश स्कूल आणि श्री छत्रपती शिवाजीराजे पब्लिक स्कूल विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय प्रेरणादायी गीतेवरील सादरीकरणासह सर्वांना मंत्रमुग्ध केले, तसेच वामा दलाच्या झाशीच्या राणी लक्ष्मीबाईवरील मुलीने केलेल्या वीर तलवारबाजीसह विशेष सादरीकरण केले. याप्रसंगी नॅशनल स्टुडंट आर्मीच्या व स्काऊट गाईड कॅडेट्सनी नेत्रदीपक मार्गावरून ड्रिल करून राष्ट्रध्वज व पाहुण्यांना विहंगम सलामी दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रभारी समन्वयक राजा कदम, अजय इंगळे, बबन येटरे, संजय इंगळे, अमृत इंगळे, बाबा लिल्हारे, राजू शुक्ला, संजय दुबे, सूरज नशिने, मुकेश तिवारी, अभय सावंत, बाल्या केकत, प्रल्हाद विश्वकर्मा, अजिंक्य इंगळे, चंद्रभान तरोणे, अमित अवस्थी, योगेश गिरिया, विवेक जगताप, जावेद खान, आकाश अग्रवाल, नीरज गिरीया, फतेहलाल परिहार, योगेश वर्मा, हर्ष कावळे, सागर दास, बनी कानोजी, अदमान शेख, इनाम शेख, दक्ष कनोजिया, सायनेश सहारे, अमानत शेख, हिमांशू मानकर आदींनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन अजय इंगळे यांनी केले तर आभार अमृत इंगळे यांनी मानले.



# कचारगड यात्रेत यात्रेकरू खड्ड्यांतून चालणार का?

**सालेकसा :** संपूर्ण आदिवासी समाजाचे श्रद्धास्थान असलेले सालेकसा तालुक्यातील कचारगड धनेगाव येथील कचारगड यात्रा मध्य भारतातील सर्वात मोठा उत्सव मानला जातो. ही कचारगड यात्रा ३ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारीपर्यंत चालणार असून देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या आदिवासी भाविकांना तसेच इतर पर्यटकांना जीवघेणा खड्ड्यातून यात्रा करावी लागणार आहे. हे चारही बाजूंनी येणाऱ्या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून ते अद्यापही बुजविण्यात आले नाहीत. त्यामुळे कचारगड यात्रेकरू खड्ड्यांतून प्रवास करणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

दरवर्षी माघ पौर्णिमेला येणाऱ्या कचारगड यात्रेत देशाच्या १८ राज्यांतून



आदिवासी समाजाचे जवळपास पाच ते सहा लाख लोक येत असतात. श्रद्धेचे केंद्र असलेल्या कचा रगड येथेसुद्धा कोरोना महामारीचा सतत तीन वर्ष जबरदस्त फटका बसला. यंदा पूर्ण क्षमतेने कचारगड यात्रा चालणार. यंदाच्या यात्रेत सहा ते सात लाख भाविक सहभागी होण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी सर्व विभागांची बैठक आयोजित केली होती . भाविकांना त्रास होऊ नये म्हणून वेगवेगळ्या विषयां वर चर्चा करण्यात आली. परंतु महत्त्वाचे म्हणजे कचारगडच्या दिशेने येणारे सर्व रस्ते दररोज अपघाताला आमंत्रण देत आहेत. पावलो पावली खड्डे पडले आहेत.

यामध्ये आमगाव-सालेकसा-दरेकसा मार्ग, देवरी-सालेकसा-धनेगाव मार्ग, डोंगरगड-दरेकसा मार्ग, लांजी-सालेकसा कचारगड मार्ग या मोठ्या राज्य महामार्ग आणि राष्ट्रीय महामार्गावर फक्त खड्डेच दिसून येत आहेत. अशात कचारगड यात्रेत सहभागी होणाऱ्या भाविकांची चारचाकी, दुचाकी वाहने कशी पुढे जाणार याची काळजी वाटत आहे.

### यात्रेकरुना बसणार फटका

**जिल्हा मुख्यालया पासून या ठिकाणी जाण्यासाठी आमगा व ते दरेकसा हा रस्ता पूर्णत: खड्ड्यां मध्ये बदलला आहे. दिवसभरात जेवढे भाविक येत असतात, अशा परिस्थिती त रात्रीच्या वेळी रस्त्यावरून जाताना किती ही सावधपणे वाहन चालवले तरी अपघात टाळता येत नाही. तिरखेडी-सालेकसा, पिपरिया-धनेगाव रस्तायासह चारही दिशांनी येणारे रस्ते पूर्णत: खड्ड्यांमध्ये रूपांतरित झाले. त्यामुळे या मार्गावरून जाणाऱ्या यात्रेकरूंना ही त्रासाला सामोरे जावे लागणार आहे.**

**दुर्गाप्रसाद कोकोडे, अध्यक्ष, कचारगड देवस्थान समिती, धनेगाव**

# १४.४३ कोटींची योजना पोहोचली १५० कोटींवर

**गोंदिया :** अर्जुनी मोरगाव तालुक्यात हरीतक्रांती घडवून आणण्यासाठी तत्कालीन जलसंपदा मंत्री महादेवराव शिवणकर यांनी झाशीनगर सिंचन योजनेची पायाभरणी केली. मात्र, आज ही योजना येथील शेतकऱ्यांसाठी दिवास्वप्न ठरली आहे. झाशीनगर योजनेला ऑक्टोबर १९९६ मध्ये १४ कोटी ४३ लाख रुपये खर्चाची प्रशासकीय मान्यता मिळाली. आज ही योजना १५० कोटीवर पोहोचली आहे. आजही शेकडो एकर शेती सिंचनाच्या प्रतिक्षेत आहे. योजनेला उशिर होत असल्याने अधिकारी, कंत्राटदाराच्या कर्तव्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहेत.

तत्कालीन भाजपा-शिवसेना युतीच्या शासन काळात पाटबंधारे मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री महादेवराव शिवणकर यांनी शेतकऱ्यांसाठी हरित



क्रांतीचे स्वप्न साकारणारी झाशीनगर उपसा सिंचन योजना अर्जुनी मोरगाव तालुक्यातील येरंडी गावाजवळ इटियाडोह प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात उत्तर दिशेला झाशीनगर उपसा सिंचन योजनेचा सन १९९५-९६ मध्ये प्रस्ताव तयार करण्यात आला. योजनेला १८ ऑक्टोबर १९९६ मध्ये १४ कोटी ४३ लाख रुपये खर्चाला प्रशासकीय मान्यता मिळाली.

योजनेत बुडीत क्षेत्रातून २५.२३ दशलक्ष घनमीटर पाण्याचा उपसा करून झाशीनगर, धाबेपवनी परिसरातील १२ आदिवासीबहुल गावातील २ हजार ५०० हे. आर. जमिन सिंचनाखाली आणण्याचे नियोजन करण्यात आले. योजना सन २००५-०६ मध्ये पूर्णत्वास येणे अपेक्षीत होते. सन २००८ मध्ये तत्कालीन आमदार नाना पटोले यांनी ४५ कोटी १८ लाख रुपयांची सुधारीत प्रशासकिय मान्यता मिळवून दिली. हे काम सन २०११ पर्यंत कासवगतीने सुरूहोते.

अप्रोच चॅनलचे जवळपास ९० टक्के काम पूर्ण झाले होते. उर्ध्वनलिका मांडणीचे काम ५० टक्के पूर्ण झाले होते. मुख्य कालव्याचे १३.५० किमीपर्यंत मातीकाम ५० टक्के पूर्ण झाले होते. यानंतर लघु व उपलघुकालव्याचे सर्वेक्षण करण्यात आले. मात्र निधी अभावी हे काम पुर्णत्वास जाऊ सकले नाही. आज योजनेची सुधारीत किंमत १५० कोटींवर पोहचली आहे. २०२१-२२ मध्ये योजाना पुर्णत्वास आली असली तरी राजकीय पुढाऱ्यांच्या श्रेय वादामुळे शेती सिंचनाला मुकली आहे.

# १० ते २० फेब्रुवारी दरम्यान हत्तीरोग दुरीकरण मोहिम



**गोंदिया :** हत्तीरोग हा कधीही बरा न होणारा रोग असून हा रोग झाल्यावर रुग्णाची त्यातून सुटका नसते. हत्तीरोग होऊ नये ही दक्षताच यावरील एकमेव उपाय असून यासाठी जिल्हाभर सामुदायिक औषधोपचार मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेला नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात या विषयी आढावा बैठक घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, डॉ. निमगडे, डॉ. भाग्यश्री त्रिवेदी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे, शिक्षणाधिकारी कादर शेख, सहसंचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग डॉ. रोशन राऊत, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार, उपशिक्षणाधिकारी अनिल चव्हाण, नायब तहसीलदार एन.एस. चवरे व सहायक पोलीस उपनिरीक्षक डॉ. अभय आंबिलकर उपस्थित होते.

हत्तीरोग दुरीकरणासाठी डीईसी व अल्बेंडाझोल गोळ्यांची सामुदायिक औषधोपचार मोहिम १० ते २० फेब्रुवारी या कालावधीत जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागात राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत आपल्याकडे येणाऱ्या आशा व आरोग्य कर्मचारी यांनी दिलेल्या गोळ्या त्यांच्या समोरच खाव्यात व स्वतःला या आजारापासून दूर ठेवावे असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. जिल्हा परिषदेच्या व खाजगी शाळांमधील मुलांच्या माध्यमातून या मोहिमेची जनजागृती करावी असे ते म्हणाले.

एकदा झालेला हत्तीरोग कुठल्याही परिस्थितीत बरा होत नाही. दक्षता हाच त्यावर एकमेव उपाय आहे. गरोदर महिला, दोन वर्षाखालील बालके व अतिगंभीर रुग्ण वगळून हत्तीरोगासाठी संवेदनशील असलेल्या लोकसंख्येतील सर्व लाभार्थ्यांनी वयोगटानुसार डीईसी व अल्बेंडाझोल गोळ्यांची एक मात्रा दरवर्षी राष्ट्रीय हत्तीरोग दिनी घेणे आवश्यक आहे. या गोळ्यांचे अजिबात साईड इफेक्ट नसून उपाशी पोटी घेऊ नये एवढीच काळजी घ्यावी, असे डॉ. चौरागडे यांनी सांगितले.

हत्तीरोगाला दूर ठेवायचे असल्यास दोन ते पाच वर्षे वय असलेल्या बालकांना डीईसी एक गोळी व अल्बेंडाझोल एक गोळी, सहा ते चौदा वर्षे वय असलेल्या बालकांना डीईसी दोन गोळ्या व अल्बेंडाझोल एक गोळी आणि पंधरा वर्षावरील सर्वांना डीईसी तीन गोळ्या व अल्बेंडाझोल एक गोळी सेवन करणे गरजेचे आहे.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार जगात १२ कोटी लोकांना या रोगाची लागण झालेली आहे. त्यापैकी ४० टक्के हत्तीरोग रुग्ण भारतातच आहेत. भारतात हा रोग देशभर पसरलेला असून केरळ, आंध्रप्रदेश, ओरिसा, पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश व बिहार राज्यातील काही भागात हत्तीरोग रुग्ण जास्त प्रमाणात आढळतात. तर महाराष्ट्रात नागपूर, नांदेड, चंद्रपूर, ठाणे, भंडारा, गोंदिया, वर्धा, गडचिरोली इ. जिल्हयात जास्त प्रमाणात आढळतात. गोंदिया जिल्हयात एकुण लोकसंख्येच्या ०.२ टक्के रुग्ण आहेत. या रोगाने रुग्ण दगावत नसला तरी त्यास अत्यंतिक शारीरिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते.

हा रोग झाल्यावर बरा होत नसल्याने रुग्णाची त्यातून सुटका नसते. विद्रुप अशी शारिरीक विकृती घेवून जगताना त्यांच्या मनात शरमेची भावना निर्माण होते. अंडवृध्दी मुळे पुरुषांच्या वैवाहीक जीवनात अडथळा निर्माण होऊ शकतो. तसेच रुग्ण नेहमीप्रमाणे काम धंदा नीट न करु शकल्याने अर्थाजनातही बाधा येऊ शकते. ही बाब लक्षात घेता हत्तीरोग दुरीकरण मोहिमेचे कर्मचारी आपल्याकडे येताच त्यांनी दिलेल्या गोळ्या त्यांच्या समोरच खाव्यात असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

# बालविवाहासाठी ग्रामसेवक,पुरोहित,फोटोग्राफर,आचारी व पाहुणे असतील कारवाईस पात्र

## महिला व बालविकास विभागाच्या अधिसूचनेची प्रभावी अंमलबजावणी होणार

**वाशिम :** बालविवाह होऊच नये यासाठी शासनाचे कडक कायदे केले आहेत. बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार दोर्षीना दोन वर्षांपर्यंत शिक्षा आणि आर्थिक दंड होऊ शकतो, परंतु, या कायद्यांना न जुमानता लपूनछपून बालविवाह करण्याचे प्रमाण व बालविवाह तत्परतेने थांबवण्याचे प्रमाण जिल्ह्यात जास्त आहे.

बदलत्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षणाचा झपाट्याने प्रसार होत आहे. त्यामुळे पिढ्यान पिढ्या चालत आलेल्या अनेक रूढी परंपरा समाजातून हद्दपार होत आहेत. भारतीय राज्यघटनेतील समतेचे तत्व आता सर्वत्र रुळू लागले आहे. मात्र अजूनही ङ्ग मुलगी झाली हो ङ्ग हे सांगतानाचे चेहऱ्यावरील नैराश्य अनेक जण लपवू शकत नाहीत. मुलगी म्हणजे ओझे ही भावना अद्यापही समाजात कायम असल्यामुळेच जिल्ह्यात बाल विवाहाचे प्रमाण वाढत आहे.

मुलाचे वय २१ व मुलीचे वय १८ पेक्षा कमी असणा?या लग्नसमारंभासाठी यापुढे ग्रामसेवक, पुरोहित, (सर्व धर्माचे), फोटोग्राफर, आचारी, मंडप डेकोरेशन, वाजंत्री पथक, डीजे, उपस्थित पाहुणे तसेच संबंधित बालकाचे आईवडील हे जबाबदार राहणार आहे. हे सर्व जण दोन वर्षाच्या सक्षम कारावासास पात्र असतील. त्यामुळे शासनाचे कान, डोळे जागरूक ठेवून या सर्वांनी असा विवाह होऊ देवू नये.

महिला व बाल विकास विभाग यांचे सुधारित परिपत्रक अधिसूचना २१ ऑक्टोबर २०२२ नुसार प्रभावी अंमलबजावणीबाबत सूचना करण्यात आलेल्या आहेत. वाशिम जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक, पोलीस निरीक्षक (शहरी/ग्रामीण), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ग्रामसेवक तथा बालविवाह प्रतिबंधक अधिकारी, विशेष बाल पोलीस पथक, यांचेमार्फत या परिपत्रकाची अंमलबजावणी होणे बंधनकारक आहे. तसेच गावाच्या ग्रामसेवकासोबतच लग्न लावून देणारे पुरोहित, (सर्व धर्माचे), प्रिंटींग प्रेस प्रिंटर्स, मंडप डेकोरेशन, फोटोग्राफर, आचारी, मंगल कार्यालायचे व्यवस्थापक तसेच उपस्थित असणारे व?हाडी, पाहुणे मंडळी यांना यापुढे आपल्याला काय करायचे अशी बेजबाबदार भूमिका घेता येणार नाही.

उलट अशाप्रकारे होणारा बाल विवाह निर्दशनास आल्यास संबंधित अधिकारी यांचे निर्दशनास आणून देण्याची भूमिका पार पाडावी लागणार आहे. अशा प्रकारचा बालविवाह झाल्यास बालविवाह प्रतिबंधक अधिकारी वरील सर्व संबंधित बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अन्वये कलम ९,१०,११ च्या कायदेशीर कारवाईस पात्र असतील. तसेच २ वर्षाचा सश्रम कारावास व एक लाख रुपये दंड होऊ शकतो. ग्रामसेवक यांना १६ (३) च्या नुसार बालविवाह प्रतिबंधक अधिकारी तसेच शहरी भागात बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात



आले आहे. त्यामुळे अशाप्रकारचे कोणताही बालविवाह झाल्यास त्यासंबंधी पुरावे गोळा करणे आणि जर वधू किंवा वर बालविवाह प्रतिबंधक अधिकारी यांच्या साह्याने न्यायालयात प्रकरण दाखल करूशकतात व अशाप्रकारे झालेला बालविवाह रद्दबातल ठरवू शकतात व त्याबाबतची माहिती मासिक त्रैमासिक माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बाल कल्याण समिती यांना सादर करावी. यापुढे अशाप्रकारचे कोणतेही बालविवाह होत असल्यास चाईल्ड लाईनच्या १०९८ तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल कल्याण समिती, विशेष बाल पोलीस पथक बाल कल्याण पोलीस अधिकारी यांचेशी संपर्क साधून नागरिकांनी बालविवाहाबाबतची माहिती देण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, वाशिम यांनी केले आहे.

# महिला सुसंस्कृत आणि शिक्षित झाली तरच त्या समाजाची प्रगती होते-सौ.अश्विनी पटले

**गोंदिया:** महिला सुसंस्कृत आणि शिक्षित झाली तरच समाजाची प्रगति होते. पुरुषांच्या खांद्याला खांद्या लावुन काम करीत असते . अशा महिलांना धिर देण्याचे काम पुरुषांचे असते राष्ट्रमाता , राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, राणी दुर्गावती या महान विभुती यांचे जिवन खडतर होते. त्या डगमगल्या नाहीत अन्याय अत्याचारा विरोधात लढण्यासाठी अग्रेसर होत्या. त्यामुळे नविन पिढीने यांचे चरित्र वाचले पाहीजे असे मार्ग दर्शन सौ.अश्विनी रविकुमार पटले जिल्हा परिषद सदस्या यांनी व्यक्त केले.

गोंदिया तालुक्यातील एकोडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या पटांगनावर एकोडी ग्राम पंचायत कडून आयोजित हळदी कुंकू कार्यकामात ते बोलत होत्या. यावेळी कार्यकामाचे अध्यक्ष जिल्हा परिषद सदस्य सौ माधुरीताई रहांगडाले तर प्रमुख पाहुणे म्हणून इंजीनियर स्नेहा गडपायले, माजी पंचायत समिति सभापती सौ.सरिता रमेश अंबुले, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.रेखाताई चौधरी, एकोडी सरपंच सौ.शालुताई मुन्नालाल चौधरी, सौ.मीनाक्षीताई राजेशजी कटरे, सहेसपुर सरपंच सौ. वंदनाताई हितेशकुमार पताहे, उपसरपंच सौ.वर्षाताई अंबुले, ग्राम पंचायत सदस्य सौ.संगीताताई अशोक रिणाईत, सौ.शबनमताई खालिक पठाण, सौ.वहिदाताई शेख, सौ.संगीताताई वरठी, सौ.रंजुताई पटले,सौ मनिषताई नामदेव बिसेन इत्यादि उपस्थित होते.

या दरम्यान हळदी कुंकू यानिमित्ताने महिलांनी उखाणे , गीत गायन करुण कार्यक्रमात रंगत आणली



महिलांना वाणाच्या स्वरुपाण सिपर भेट वस्तु देण्यात आल्या कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका आर. एम. उईके यांनी केले तर उपस्थितांचे आभार शिक्षिका ए. सी. हरिणखेडे यांनी मानले.

# कामधेनू दत्तकमुळे दुग्ध उत्पादनात वाढ

**गोंदिया:** दुष्काळी परिस्थितीमुळे सर्वत्र शेतकऱ्यांची विदारक स्थिती आहे.पारंपरीक शेतीमुळे दिवसेंदिवस शेती म्हणजे नुकसानीचा सौदा होत चालली आहे. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शेती पूरक व्यवसाय करण्याची गरज आहे.या उद्देशातून २०११-१२ पासून आतापर्यंत जिल्ह्यातील ३०६ गावांनी शासनाच्या कामधेनू ग्राम म्हणून दत्तक योजनेतंर्गत दत्तक घेऊन



दुग्ध उत्पादनात २० टक्के वाढ झाल्याचे चित्र आहे. यासाठी पशुपालकांला तांत्रिक जोड देऊन लसीकरण ते जनावरे संवर्धनापर्यंतची जबाबदारी सांभाळण्याची किमया पशुसंवर्धन विभागाकडून कामधेनू दत्तक गावात करण्यात येत आहे. या योजनेतंर्गत जिपच्या पशुसंवर्धन विभागाद्वारे ३०० पैदास योग्य पशु असणाऱ्या गावांची पशुगणना करुन त्या गावांची कानधेनू दत्तक ग्राम म्हणून निवड करण्यात आली.ज्या गावाला दत्तक घेतले त्या गावातील सर्व जनावरांचे लसीकरण, दुग्ध उत्पादन कसे वाढविता येईल,जनावरांची औषधे, खनिजद्रव्ये, जंतना शक औषधी आदी उपाययोजनांसह शेतकऱ्यांची सहल, संकरित वासरांचा मेळावा,जनावरांच्या विस्तारासाठी कार्यकर्य,चारा व खताचे व्यवस्थापन आदी उपक्रम राबविले जातात.

ज्या गावाला कामधेनू दत्तक घेतले, त्या गावाला वर्षाकाठी १ लाख ५२ हजार रुपये जनावरांच्या संवर्धनासाठी देण्यात येतात. कामधेनू गावातील शेतकरी व पशुमालकांना मार्गदर्शन करण्यासाठी अधिकारी एक दिवस मुक्काम राहतात. जिल्ह्यात २०११-१२ पासून ही योजना राबविली जात असून पूर्वीच्या तुलनेत दुध उत्पादन २० टक्क्याने वाढले असून या गावांनी दुग्ध व्यवसायातून विकास साधला आहे.

कामधेनू दत्तक गावाला वेळोवेळी मार्गदर्शन करुन तेथील दुध उत्पादनावर लक्ष केंद्रीत केल्यामुळे जिल्ह्यातील कामधेनू दत्तक गावांत २० टक्क्याने दुधाचे उत्पादन वाढ आहे.त्या गावांतील पशुंची देखरेख व मार्गदर्शन करण्यासाठी एक दिवस दत्तक गावात मुक्काम केला जात असल्याचे जिपचे पशुसंवर्धन अधिकारी डॉ. कांतीलाल पटले यांनी सांगितले.

# विधानसभाक्षेत्रात प्रत्येकी २५ लाखाचे ३२ महिला बचत भवन बनविणार

**देवरी:** बचत गटातील महिलांना एकत्र बसून चर्चा करता यावी, यासाठी देवरी-आमगाव मतदार संघात प्रत्येकी २५ लाख रूपये खर्चून ३२ बचतभवन निर्माण करणार असल्याची घोषणा आमदार सहसराम कोरोटे यांनी देवरी येथे बोलताना केली. स्थानिक सीताराम मंगल कार्यालयात गेल्या सोमवारी (दि.२३) सीमा कोरोटे तथा महिला काँग्रेसच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या महिला मेळाव्यात ते बोलत होते.

या मेळाव्याचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्य ऊषा शहारे ह्या होत्या. मेळाव्याचे उद्‌घाटन सामाजिक कार्यकर्त्या सीमा कोरोटे यांचे हस्ते करण्यात आले. द्वीप प्रज्वलन जि.प. सदस्य राधिका धरमगुळे यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सहराम कोरोटे, माजी जि.प. सदस्य माधुरी कुंभरे, देवरी तालुका महिला कांग्रेस अध्यक्ष सुनंदा बहेकार, माजी तालुका अध्यक्ष राधेशाम बगडिया, नवनियुक्त देवरी शहराध्यक्ष ओमप्रकाश रामटेके, जिल्हा आदिवासी आघाडीचे नवनियुक्त



अध्यक्ष सोनू नेताम, पं.स.सदस्य प्रल्हाद सलामे, रंजित कासम, भारती सलामे, अनुसया सलामे, नगरसेवक शैंकी भाटिया, बबलु कुरैशी, नगरसेविका सुनिता शाहू आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार कोरोटे म्हणाले की, विधानसभा क्षेत्रातील लोकांच्या विविध समस्या आहेत. बचत गटातील महिलांना एकत्रित बसून चर्चा करण्यासाठी जागा उपब्ध नाही, अशी महिलांची गेल्या अनेक दिवसापासून तक्रार होती. बचत गटातील महिलांसाठी एखादे हक्काचे बचत भवन असले पाहिजे. यासाठी संपूर्ण विधानसभा क्षेत्रात प्रत्येकी २५ लाख रूपये खर्चून एकूण ३२ महिला बचत भवन तयार करण्याचा मानस आहे.

दरम्यान, सीमा कोरोटे व महिला काँग्रेसच्या वतीने तालुक्यातील सर्व सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाची सांगता उपस्थित सर्व महिलांना हळदी कुंकू, वान वाटप, तीळ-गूळ व अल्पोहाराने करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनंदा बहेकार यांनी केले. संचालन सचिन मेळे व किरण राऊत यांनी तर उपस्थितांचे आभार अर्चना नरवरे यांनी मानले. या मेळाव्याला देवरी तालुक्यातील सर्व नवनिर्वाचीत सरपंच,उपसरपंच,ग्रा.पं. सदस्य व पक्षाचे कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# कर्मचारी,मजूर,कामगारांच्या लढाईसाठी मजदूर युनियन-पाटील

## गोंदिया जिल्हा अध्यक्षपदी अरविंद साखरे यांची निवड



**गोंदिया:-** पदोन्नतीतील आरक्षण लागूकरून जुनिपेन्शन मिळावी यासाठी संपूर्ण भारतभर मजूर कामगार कर्मचाऱ्यांच्या हितासाठीची लढाई स्वतंत्र मजदूर युनियन लढाई लढते आहे. असे प्रतिपादन राष्ट्रीय अध्यक्ष जे. एस. पाटील यांनी (ता.२९) केले. गोंदियात आयोजित एका सभेला संबोधित करताना श्री पाटील अध्यक्ष पदावरुन बोलत होते.

मंचावर महावितरणचे सेवानिवृत्त मुख्यअभियंता बंडूभाऊ वासनिक, कार्यकारी अभियंता वाय. बी. मेश्राम, आणि प्रभारी अधीक्षक अभियंता धम्मदीप फुलझेले आदी मान्यवर उपस्थित होते. श्री पाटील यांनी यांप्रसंगी मजदूर युनियनची विस्तृत माहिती दिली ते पुढे म्हणाले की, फुले शाहू आंबेडकरी तत्वज्ञानामुळे तळागाळातील माणसांची समस्या संपूस्टात येऊ शकते असे सांगून सण १० जुन १८९० मध्ये महात्मा फुल्यांचे सत्यशोधक चळवळीचे शिस्य नारायण मेघा लोखंडे यांनी मजुरांसाठी प्रथम आंदोलन केलं असून खऱ्या अर्थाने भारतीय मजदूर दिवस याचं दिवसाला म्हणता येईल असा युक्तिवाद त्यांनी केला. मागासवर्गीयांचे संघटित व असंघटित क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी, कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित असून यासाठी एकजुटीने संघर्ष करण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

याप्रसंगी गोंदिया जिल्हा शाखेची कार्यकारिणी गठीत करण्यात येवून अध्यक्षपदी गोरेगाव पंचायत समितीचे ग्रामसेवक अरविंद साखरे, उपाध्यक्षपदी अर्जुनी/मोर पंचायत समितीचे ग्रामसेवक पी. वाय.नगराळे, सचिव विस्तार अधिकारी शिक्षण अहिल्याताई खोब्रागडे, सहसचिव शिक्षक संतोष डोंगरे, कोषाध्यक्ष तिरोडा पंचायत समितीचे ग्रामसेवक योगेश्वर डोंगरे, संघटक आमगाव पंचायत समितीचे विस्तार अधिकारी एल. एन. कुटे, सल्लागार अर्जुनी मोर पंचायत समितीचे ग्रामसेवक पृथ्वीराज कोल्हटकर आणि सदस्य म्हणून धर्मेंद्र (छोटू )बोरकर, अभय मेश्राम, देवेंद्र हत्तीमारे, सुनील बडगे, शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त सुशील गणवीर यांची निवड करण्यात आली आहे. या सर्वांचे अभिनंदन करण्यात आले. सभेचे संचालन डेप्युटी इंजिनिअर अमित पाटील यांनी तर आभार धर्मेंद्र बोरकर यांनी मानले. यावेळी गोंदिया जिल्ह्यातील कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# आता जिल्ह्यातही रायफल शुटिंगचे प्रशिक्षण

**गोंदिया:** जिल्ह्यातही नेमबाजी खेळात आपले करिअर घडविण्यासाठी अनेक खेळाडू प्रयत्नरत आहेत. मात्र जिल्ह्यात नेमबाजी प्रशिक्षणाची सुविधा नसल्याने बाहेर जावे लागते. मात्र आता जिल्ह्यातही ही प्रतिक्षा संपली असून जिल्हा क्रीडा संकुलात अत्याधुनिक पध्दतीने रायफल शुटिंगचे प्रशिक्षणाला सुरवात झाली आहे, अशी माहिती जिल्हा रायफल असोसिएशनतर्फे आयोजित पत्रपरिषदेत सचिव अविनाश बजाज यांनी दिली.

यावेळी प्रामुख्याने जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, सहसचिव अमर गांधी, उपाध्यक्ष राजेश गोयंनका, प्रशिक्षक नैलेश शेंडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी राठोड यांनी सांगितले की, मागील काही वर्षात



पोलिस विभागासह वैयक्तिकरित्या नेमबाजी खेळ स्पर्धेत जिल्ह्यात खेळाडू घडत आहेत. नेमबाजी खेळात करिअर घडवू इच्छूकांना जिल्ह्यातच प्रशिक्षण उपलब्ध व्हावे, यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरु होते. शासनाने यासाठी ५१ लाख उपलब्ध केले असून जिल्हा क्रीडा संकुलात करुन १० मीटर शुटिंग रेंजची निर्मिती करण्यात आली आहे. प्रशिक्षणासाठी शासनाने अत्याधुनिक ६ रायफल व ६ पिस्टल उपलब्ध करुन दिले आहेत. २२ डिसेंबरपासून प्रशिक्षणाला सुरुवात झाली असून सध्या ९ ते १४ वयोगटातील खेळाडूंना प्रशिक्षण देण्यात येत आहे. अडीच हजार रुपये मासिक प्रशिक्षण शुल्क असून सकाळी ७ ते ११ व सायंकाळी ४ ते ८ या वेळेत प्रशिक्षण दिले जात आहे. जिल्ह्यातच आता शुटिंगचे प्रशिक्षण मिळणार असल्याने नेमबाजी खेळ प्रकाराला चालना मिळणार असून भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरावरील खेळाडू जिल्ह्यातूनही घडतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.